# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY * LIBRARY *
२१|६|०७

१ ● स्वागत
३ ● परोपकार, उदारता व देणग्या
९ ● स्त्रिया व महत्त्वाकांक्षा
१४ ● जागतिकीकरणात हवा समतोल
१८ ● चीनमधील औद्योगिक क्षेत्रातील 'ग्वांक्झी'
२० ● फ्रान्समधील मुस्लिम: हिजबच्या गाठीची गुंतागुंत
२२ ● जागतिकीकरण व वस्त्रोद्योग: भारताचा फायदा !
२६ ● शांततेच्या पाऊलखुणा (शिक्षणातून शांततेकडे)
३१ ● जगाच्या पाठीवर....(शिक्षण)
३३ ● कालप्रवाहात......
३४ ● 'काल'चे 'आज'साठी

खंड ३ : अंक ८ नोव्हेंबर २००४

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

<u>**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**</u>

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---

<u>**वर्गणीसाठी पत्ता :**</u>

व्यवस्थापक,
**अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२
: २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल : ispe@vsnl.com

---

**अर्थबोधपत्रिका**
**खंड ३ (अंक ८) नोव्हेंबर २००४**
**संपादक - रमेश पानसे**
**संपादन साहाय्यक - राज्यश्री क्षीरसागर**

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## ‘अर्थबोधपत्रिके’तील माहिती कशी?

**जी सहज चाळता येईल अशी !**

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे ‘अर्थबोधपत्रिका’ हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.**

◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न.

◆अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने’** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.

◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# स्वागत

'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकामध्ये दोन अगदी नवे विषय आले आहेत. एक आहे परोपकार, उदारता, देणग्या यांच्या संदर्भातला. समाजकल्याणाचे कार्य जसे सरकार करीत असते, तसेच ते, समाजाचे काही प्रश्न हाती घेऊन काम करणाऱ्या स्वेच्छाकार्य संस्थाही करीत असतात. जगाच्या सर्वच संस्कृतींमध्ये दानाची संकल्पना, प्रामुख्याने 'धर्मा'च्या अंगाने स्वीकारली गेली आहे.(अशा देणग्यांचे नियंत्रण करणाऱ्या शासकीय कार्यालयाला आपण 'धर्मादाय कार्यालय' असेच नाव प्रदान केले आहे) 'धर्मा'साठी दान देणे आणि देण्याचा 'धर्म' पाळणे हा व्यवहार हजारो वर्षे घडतच आला आहे. आजही याच कारणाने मोठ्या प्रमाणावर 'दानधर्म' चालत असतोच. पण, अलीकडे, या दानाला, 'धर्मबाह्य' असेही परिमाण लाभले आहे. सामाजिक प्रश्नांकडे निखळ दृष्टीने पाहून, त्याच्या सोडवणुकीसाठी पैसारूप, वस्तूरूप आणि वेळरूप दान देण्या-घेण्याचा नवा प्रघात प्रस्थापित झाला आहे. याविषयीच्या काही अभ्यासांचा आढावा, या अंकामध्ये घेण्यात आला आहे.

चीनच्या संदर्भात, आजवर, अनेक लेख 'अर्थबोधपत्रिके'ने प्रसिद्ध केले आहेत. जपान काय किंवा चीन काय, त्यांच्या औद्योगिक प्रगतीत व्यक्तिसंबंध, कुटुंबसंबंध यांना काही खास स्थान आहे आणि त्यांचे पडसाद अगदी अर्थशास्त्रीय सैध्दांतिक लेखनातही पडू लागले आहेत. चीनमध्ये 'ग्वांक्झी' पद्धतीने तथाकथित 'स्पर्धे'च्या तत्त्वज्ञानाला नि व्यवहाराला काही वेगळेच वळण प्राप्त झाले आहे. वाचकांना ही सारी माहिती गंमतीदार नि उपयुक्त वाटेल. असाच एक लेख आहे, दुसऱ्या जागतिक युद्धाच्या तोंडावरील, १९३९ सालची मादाम मॉंटेसोरी यांचा, 'शिक्षणातून शांततेचे' आव्हान करणारा लेख, वाचकांना, आता या घटनेला पासष्ट वर्षे होऊन गेल्यानंतर अधिकच कालसुसंगत वाटेल, अशी आशा आहे.

'अर्थबोधपत्रिके'चा वाचकवर्ग वाढावा यादृष्टीने वर्गणीतील सवलतींची भेट योजना या अंकात जाहीर केलेली आहे. आजच्या वर्गणीदारांनीही याचा लाभ घ्यावा आणि इतर परिचितांनाही आपल्या, वाचकांच्या विस्तारित कुटुंबात आणावे अशी आग्रहाची विनंती आहे. ■■

## वाचकांचा प्रतिसाद

आपल्या अर्थबोधपत्रिकेचा मी गेले दोन -तीन वर्षे सभासद -वाचक आहे. दरवेळी अंक अथपासून इतिपर्यंत एकाच बैठकीत वाचून काढतो. दरवेळी अभिप्राय व्यक्त करावा असे प्रकर्षाने वाटते. परंतु दरवेळेस तेच मत व्यक्त करणेही योग्य नाही. कारण जी गोष्ट एकदा चांगली, दर्जेदार ठरते तिचा दर्जा सतत तसाच ठेवण्याच आपण खरोखरच यशस्वी झालेले आहात. जागतिक स्तरावरील, राजकीय, आर्थिक, औद्योगिक, सामाजिक अशा विविध विषयांचा अगदी थोडक्यात व सर्वंकष मागोवा घेण्याची आपली हातोटी वाखाणण्याजोगी आहे. अर्थबोधपत्रिकेचा वाचक वर्ग अधिकाधिक वाढावा या शुभेच्छा. पुनश्चः आपले अभिनंदन. *अरविंद. भा. सहस्रबुद्धे, ठाणे.*

मी अर्थबोधपत्रिकेचा नियमित वाचक आहे. मला अर्थबोधपत्रिका आवडते.

*अशोक आठवले, यवतमाळ*

अर्थबोधपत्रिकेचे अंक आवडतात. यात ग्रामीण विकास, शेती सुधारणाविषयक ज्ञान आणि दारिद्रय निर्मूलन या विषयावरील लिखाण प्रसिद्ध व्हावे.

*सुरेश गोपाळ काळेश्वरवर, नांदेड*

अर्थबोधपत्रिका वाचली. अभ्यासनीय व उत्कृष्ट आहे.

*डॉ. शामकांत भामरे, चाळीसगाव.*

## मंगळ, मिथेन आणि जीवसृष्टी

मंगळावर जीवसृष्टी होती का ? भविष्यात तेथे जीवसृष्टी स्थापन होण्याची शक्यता आहे का ? यासंबंधीचे विविध संशोधन पुढे येत्त आहे. त्यातूनच मंगळावर मिथेन हा वायू सापडल्याचे अनेक शास्त्रज्ञांनी म्हटले आहे. यासंबंधी अलीकडेच (सप्टेंबर२००४) इटलीमध्ये झालेल्या एका परिषदेत डॉ.विट्टोरिओ फॉरमिसानो या शास्त्रज्ञाने मंगळावर सर्व ठिकाणी मिथेन नसून जिथे बाष्प जास्त प्रमाणात आहे तिथेच तो आहे, असे म्हटले आहे. बर्फ, पाणी आणि मिथेन यांचा परस्परसंबंध आहे आणि या प्रक्रियेतून मिथेन तयार होण्यासाठी साहाय्यभूत ठरणारे बॅक्टेरिया तयार होत असावेत, असाही अंदाज आहे. या प्रक्रिया भौगोलिक आहेत की जीवशास्त्रीय असा अभ्यास आता करण्यात येत आहे. दरम्यान, याचा अभ्यास करण्यासाठी मंगळावर गेलेले बेगल-२ हे यान मंगळावर उतरल्यानंतर अचानक नाहीसे झाल्याने मिथेनबाबत मंगळाने मात्र मौन पाळले आहे. (संदर्भ -द इकॉनॉमिस्ट २५ सप्टेंबर २००४) ■■

सामाजिक

# परोपकार, उदारता आणि देणग्या

आपल्याजवळ असलेला पैसा किंवा वेळ यांचे दान करून परहित साधण्याचा प्रयत्न करणे, हा माणसाचा स्थायीभाव आहे. समाजात, एका बाजूला जसा गरजू लोकांचा वा संस्थांचा वर्ग असतो तसाच दुसऱ्या बाजूला दात्यांचा, परोपकारी व्यक्ती वा संस्थांचाही वर्ग असतो. ही दानरूपी देवाण-घेवाण जशी छोट्या समाजगटांच्या, गावांच्या पातळीवर चालते तशीच ती राष्ट्रीय नि आंतरराष्ट्रीय स्तरांवरही होत असते. या देवाण -घेवाणीला जसा धार्मिक आशय असतो, तसाच सामाजिक आशयही असतो. समाजात असणारी आर्थिक विषमता हेही दातृत्वाचे एक प्रधान कारण असते. आद्य शंकराचार्यांनी दानाची व्याख्या करताना, 'दानं संविभाजनं' अशी करून, कदाचित समाजातील आर्थिक विषमता कमी करण्याकडे अंगुलिनिर्देश केला असावा.

अलीकडे शे -दीडशे वर्षांमध्ये एका बाजूला, संघटित स्वरूपात सामाजिक कार्ये करण्याची जशी प्रथा पडली आहे तशीच, दुसऱ्या बाजूला, संघटित स्वरूपात निधी संकलन करून तो संघटित स्वरूपातच वितरित करण्याचीही परंपरा निर्माण झालेली आहे. संस्थात्मक पातळीवर चालणाऱ्या या देवाणघेवाणीत राष्ट्रीय सरकारेही मोठ्या प्रमाणावर योगदान करीत आहेत. लोकांकडून करांच्या रूपाने मोठा निधी गोळा करून त्यातील मोठा खर्च, समाजगरजेच्या नि समाजहिताच्या कार्यांवर खर्च केला जातो. विषमतेकडून समतेकडे जाण्याचा तो एक मार्ग मानला जातो. अशा प्रकारे संस्थात्मक पातळीवरून घडून येणारा हा दातृत्वाचा ओघ कशाप्रकारचा आहे आणि त्यात कसकसे बदल घडताहेत याचे, अमेरिका - युरोपच्या संदर्भातील चित्र स्पष्ट करणारा एक खास अहवाल 'द इकॉनॉमिस्ट' (३१ जुलै २००४)या साप्ताहिकाने प्रसिद्ध केला आहे.

जग, एकोणिसाव्या शतकातून विसाव्या शतकात प्रवेश करीत होते, त्या काळात अमेरिकेतील ॲन्ड्र्यू कार्निजी या महाश्रीमंत माणसाने आपल्या अफाट श्रीमंतीचा ९० टक्के भाग आपल्या आयुष्याच्या अखेरीस दानात देऊन टाकला. जॉन रॉकफेलर यांनीही अशाच पद्धतीने आपल्या संपत्तीला सामाजिकतेचे अधिष्ठान दिले. त्यामुळे या

काळाला 'दानाचे सुवर्णयुग' असे म्हटले जात असे. असेच 'दानाचे सुवर्णयुग' विसाव्या शतकातून जग एकविसाव्या शतकात प्रवेश करीत असताना पुन्हा एकदा अवतरले आहे, असे म्हणतात. 'मायक्रोसॉफ्ट' कंपनीचे बील गेटस् आणि 'ई -बे' कंपनीचे पिअरी ओमिडियर हे दोघे मोठ्या कल्पकतेने उदार दाने देत आहेत.

एकूणच अमेरिकेत अर्थसहाय्य करण्याचे प्रमाण वाढत चालल्याचे प्रत्ययाला येत आहे. १९९८ सालापासून, राष्ट्रीय उत्पन्नाच्या जवळजवळ २ टक्क्यांपेक्षाही जास्त रक्कम मदतीच्या रूपात दिली जात आहे. २००० साली तर ती २.३ टक्के एवढी होती. मागील वीस वर्षांमध्ये हे प्रमाण खूपच कमी होते. ही आकडेवारी इंडियाना विद्यापीठाच्या 'सेंटर ऑन फिलनथ्रपी'ने प्रकाशित केली आहे. मात्र ११ सप्टेंबर २००१ च्या घटनेनंतर अमेरिकेत कायद्याने देणग्यांवर आणि त्यांच्या देवाण -घेवाण करणाऱ्या स्वेच्छासंस्थांवर बरेच लक्ष ठेवले जात आहे.

महत्त्वाची घटना अशी आहे की, आता युरोप -अमेरिकेत एक नवा 'दात्यां'चा वर्ग पुढे येत आहे. त्यांचा दृष्टिकोणही वेगळा आहे. शिवाय, या भूविभागातील लोकांची वाढती मालमत्ता आणि वाढते आयुर्मान यांमुळे जिवंत असलेल्यांकडून वाढत्या देणग्या आणि मृतांच्या वारसांना मोठ्या संपत्तीचा लाभ मिळणार आहे. अधिकाधिक लोकांकडे, त्यांना आपल्या मुलांसाठी ठेवावासा वाटतो त्यापेक्षाही कितीतरी अधिक पैसा हाती येत असल्यामुळे, देणग्यांच्या क्षेत्रात एक प्रकारचे नवे सुवर्णयुगच अवतरत आहे, असे मत, बोस्टन कॉलेजच्या पॉल शेवरिश यांनी व्यक्त केले आहे. पैसे कसे उभे करावेत याचा सल्ला देणारे टोनी नेट यांच्या म्हणण्यानुसार आता, अतिरिक्त पैसा उपलब्ध होणार आहे. 'देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी' अशी स्थिती होणार आहे. पैसा मागण्यासाठी चांगल्या उपयुक्त कल्पनांचीच उणीव आहे.

परोपकाराचे मोजमाप करणे तसे कठीण असले तरी एक गोष्ट ठळकपणे दिसते ती अशी की, सर्वच श्रीमंत राष्ट्रांमधून वैयक्तिक - खाजगी देणग्यांचे प्रमाण, सरकारी कल्याणकारी खर्चाच्या तुलनेत खूपच कमी आहे. पैशांच्या स्वरूपातील देणग्यांच्या बाबतीत अमेरिकेचा हात दुसरा कोणता देश धरू शकणार नाही. यात, अर्थातच, धार्मिक संस्थांना दिलेल्या धनाचे प्रमाण मोठे आहे. जॉन हॉपकिन्स विद्यापीठाचे लेस्टर सॉलोमन आणि त्यांचे सहकारी यांचा 'ग्लोबल सिव्हिल सोसायटी' या ग्रंथाचा दुसरा भाग - 'डायमेन्शन्स ऑफ द नॉन -प्रॉफिट सेक्टर', हा नुकताच प्रसिद्ध झाला आहे. (राष्ट्रसंघाच्या राष्ट्रीय उत्पन्न मोजमापाच्या पद्धती या ग्रंथाच्या मार्गदर्शनाने ठरणार

आहेत !) यात जगातील ३६ राष्ट्रांचा अभ्यास आहे. धार्मिक देणग्यांचे प्रमाण अमेरिकेत राष्ट्रीय उत्पन्नाच्या १ टक्के आहे, तर तेच इस्रायलमध्ये १.३ टक्के तर दुसऱ्या टोकाला इटली नि भारतात फक्त ०.१ टक्का इतकेच आहे. यात अर्थातच संस्थांना दिलेल्या रकमा समाविष्ट नाहीत.

सरकारचा समाज -कल्याणावरील खर्च, खाजगी समाज -कल्याणासाठी दिलेल्या देणग्यांच्या तुलनेत पाहिला तर कितीतरी अधिक आहे. अर्थात, त्यांमध्येही, राष्ट्रराष्ट्रांमधील फरक आहेतच. उदाहरणार्थ, अमेरिकेत हा खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या १८ टक्के तर ब्रिटनमध्ये तो २८ टक्के इतका मोठा आहे. सालोमन यांच्या पुस्तकात 'देणग्यां'चे एक नवे परिमाण मांडण्यात आले आहे; ते म्हणजे, स्वेच्छकार्य म्हणून लोकांनी दिलेला वेळ. अलीकडे असेही आढळून आले आहे की, पैशांपेक्षाही, कुणीतरी सामाजिक कार्यासाठी आपला 'वेळ' विनामूल्य देणे याला अधिक महत्त्व येत चालले आहे. समाजकार्यासाठी दिलेल्या वेळेला, त्या समाजकार्यातील कार्यकर्त्याला मिळणाऱ्या सरासरी वेतनाने गुणले तर या (विनामूल्य दिलेल्या) वेळाचे मूल्य ठरविता येते. सालोमन (आणि सहकारी) यांना असे आढळले की, एकूण देणग्यांमध्ये 'स्वेच्छावेळे'च्या रूपात दिलेल्या देणग्यांचे मूल्य जवळजवळ ६० टक्के इतके आहे. नीदरलँडस्, स्वीडन आणि इतर स्कँडेनेव्हियन देशांमध्ये 'वेळा'च्या रूपातील दानाचे प्रमाण बरेच मोठे आहे. काही विकसनशील देशांमध्येही ते मोठे आहे.

## धर्मकारणी दान

परोपकार, उदारता, दान यांचा धर्मकारणाशी खूप घनिष्ठ संबंध आहे. आपण दानधर्म करणे, असाच जोडशब्द वापरत असतो. धार्मिक कारणाने दान -दक्षिणा देणे हे प्रत्येक धर्मातच अनुस्युत आहे. काही वेळा धर्मानेच अशा दानधर्माचे - धर्मदानाचे किमान प्रमाणही ठरवून दिले आहे. उदाहरणार्थ, ख्रिश्चन, ज्यू, शीख या धर्मांमध्ये दहा टक्क्यांचे उद्दिष्टही ठरवून दिलेले आहे. 'झक्कत' किंवा 'दानाच्या रूपांतील कर' हा इस्लाम धर्माचा एक पायाच मानला जातो. अमेरिकेतील धार्मिक संस्थांना दिल्या जाणाऱ्या रकमांची काही माहिती उपलब्ध आहे. इंडियाना विद्यापीठात असे काही अभ्यास करण्यात आलेले आहेत. त्यांनुसार देणग्यांमधील ६२ टक्के रक्कम धर्माकडे वळविली जात आहे. तर, एक अभ्यास असे दाखवून देतो की अमेरिकेतील सर्वात गरीब २० टक्के लोकसंख्येतील लोक, सरासरीने, दरसाल २३४ डॉलर्स धर्मासाठी तर केवळ ८५ डॉलर्स इतर कारणांसाठी दान म्हणून देतात. गोऱ्यांपेक्षा काळ्यांच्या बाबतीत

या दोन्ही रकमा मोठ्या आहेत. धर्म आणि इतर कारणांसाठी अनुक्रमे ९२४ डॉलर्स आणि ४३९ डॉलर्स, दरसाल दरडोई दिले जातात. अमेरिकेतील एका अभ्यासाने असेही दाखवून दिले आहे की धर्म मानणारे लोक धर्मातीत लोकांपेक्षा अधिक प्रमाणात दान करीत असतात. युरोप हा अमेरिकेएवढा धर्मवेडा नसावा. कारण, तेथे धर्मसंस्थांना दिल्या जाणाऱ्या देणग्यांचे प्रमाण खूपच कमी आहे. 'चॅरिटिज एड फौंडेशन' या विश्वस्त संस्थेने दिलेल्या आकडेवारीनुसार पाचशे संस्थांना दिलेल्या सर्वात मोठ्या देणग्यांमधील केवळ १० टक्के रक्कम धर्मकारणासाठी होती.

एक तात्त्विक प्रश्न समोर उभा राहतो; की, अशातऱ्हेने लोक पैशाची काय किंवा वेळेची काय, पण देणगी द्यायला तयार का होतात ? काम करून पैसे मिळवायचे ते असे देऊन टाकण्यासाठी ? अर्थशास्त्राचे लोक, 'स्वार्था'वर आधारित असे शास्त्र मांडतात; आणि मग या 'निस्वार्थी' किंवा 'परोपकारी' कृतीमध्ये काही स्वार्थ दडलेला आहे का, याचा शोध घेतात. याविषयीचाही एक अभ्यास, 'जर्नल ऑफ एक्सपरिमेंटल सोशल सायकॉलॉजी' (व्हॉल्यूम ३८, २००२) या नियतकालिकात प्रसिद्ध झाला आहे. (डेल मिलर, जॉन होम्स व मोल्विन लर्नर यांनी 'कमिटिंग अल्ट्रइझम अंडर द क्लोक ऑफ सेल्फ इंटरेस्ट: द एक्स्चेंज फिक्शन' या शीर्षकाखाली हा लेख लिहिला आहे.) या अभ्यासाने, अर्थशास्त्री सामान्यत: मानतात त्याच्या अगदी विरोधी विचार वास्तव म्हणून मांडला आहे. परोपकारात स्वार्थ दडलेला असतो असे नव्हे तर, आपल्या दानामधील परोपकारच, अगदी वरवरच्या स्वार्थात दडविण्याचा प्रयत्न करूनच लोक अधिक दानाला उद्युक्त होत असतात. उदाहरणार्थ, दानासाठीचे कारण प्रभावी असेल तर म्हणजे समजा, भावनिकदृष्ट्याा ताणाने पछाडलेली मुले भेटवस्तू बदल्यात दिल्याने देणग्यांमध्ये तिप्पट वाढ झाली. या उलट फारसे प्रभावी कारण नसते तेव्हा, भेटवस्तू बदल्यात दिल्यानेसुद्धा फारसा फरक पडत नाही.

### देणग्यांसाठी प्रोत्साहन

विविध सामाजिक प्रश्न हाताळणाऱ्या स्वेच्छाकार्य संस्थांना वाढत्या प्रमाणात देणग्या मिळाव्यात यासाठी स्वत: सरकार काही प्रयत्न करू शकते का ? करते का ? युरोपमध्ये तरी याबाबत बरीच हालचाल होत आहे. सरकार करांमध्ये सवलती देऊन लोकांना अधिक दानासाठी उद्युक्त करीत आहे. अमेरिकेतही अशा सवलतींचा फायदा मिळतो. काही प्रमाणात, भारतासारख्या देशांमध्येही देणग्यांवर करसवलत मिळण्याची व्यवस्था आहे. अमेरिकेत 'योजनाबद्ध देणग्यां'ची एक व्यवस्था आहे. जो दाता

असतो, त्याने, भांडवली स्वरूपाची कायमची देणगी द्यायची आणि त्याचवेळी आपल्या हयातीत या देणगीवरच्या व्याजाच्या उत्पन्नावर जगायचे. अशी तरतूद युरोपमध्ये मात्र अजून नाही; असे थेरेसा लॉईड, आपल्या 'व्हाय रिच पीपल गीव्ह' या अभ्यासामध्ये नमूद करतात. इंग्लंड, अमेरिकेत देणग्या आणि त्यावरील करसवलत यांची सांगड घालणारी आणखी एक प्रथा आहे; त्याला 'पेरोल गिव्हिंग' असे म्हणतात. म्हणजे, आपल्या पगारातून देणगीची रक्कम कापून दिली जाते. अमेरिकेतील कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांपैकी जवळजवळ एक तृतीयांश लोक या योजनेत सहभागी झाले आहेत. इंग्लंडमध्ये ही संख्या फक्त २ टक्केच आहे. कारण, तेथे यासाठी स्वतंत्रपणे प्रोत्साहन दिले जात नाही. अमेरिकेत कर्मचाऱ्यांना यासाठी नुसतं प्रोत्साहितच केले जाते असे नव्हे तर तेथे हे कर्मचाऱ्यांकडून अपेक्षितच असते.

कर आणि देणग्या यांचा संबंध दुहेरी आहे. करांचा मोठा भार हा लोकांचा उत्पन्नात नि मालमत्तेत घट घडवतो; त्यामुळे त्यांची दानाची शक्ती मर्यादित होते. म्हणून जर देणग्यांवर करांमध्ये भरपूर सवलती दिल्या तर मात्र लोकांना उत्पन्नाच्या कमी नुकसानीत जास्त रक्कमा देणगी म्हणून देता येतात. अर्थशास्त्रीय परिभाषेत, देणगीदारांना देणग्यांची पडणारी किंमत कमी होते. अर्थात, एक गोष्ट नक्की की करसवलती या लोकांना दातृत्वासाठी प्रवृत्त करीत नाहीत तर द्यायचे असेल तर अधिक द्यायला मात्र प्रोत्साहित करतात. त्यातही हा परिणाम अधिक श्रीमंत असणाऱ्यांच्या बाबतीत जास्त करून घडून येईल. त्यामुळे श्रीमंतांनाच आकृष्ट करतील अशा मोठ्या देणग्यांवरच हा परिणाम अधिक दिसून येईल.

युरोप -अमेरिकेत अलीकडे मोठ्या प्रमाणावर 'निधी (देणाऱ्या) संस्था' स्थापन होत आहेत. १९८० च्या आसपास अमेरिकेत सुमारे २००० निधीसंस्था होत्या. त्यांची संख्या आता ६५ हजारवर गेली आहे. जर्मनीतही पूर्वी दरसाल दोनशेच्या आसपास निधीसंस्था स्थापन होत असत; आता ही संख्या ८००-९०० वर गेली आहे. करसन टिमर यांच्या अभ्यासात याचे कारणही दिले आहे. ते म्हणतात की जर्मनीत, प्रथमतःच सतत साठ वर्षे शांततेची गेली आहेत. (गेल्या हजार वर्षांमधली ही एक अपूर्व घटना आहे !) शिवाय युद्धोत्तर काळातील जर्मनीला उभारी देणाऱ्या उद्योगपतींची मागील पिढी आता निवृत्त होऊन नवी युवापिढी आली आहे व ती आता मोठ्या प्रमाणात निधीसंस्थांच्या कार्यात लक्ष घालीत आहे; त्यांच्यासाठी एक नवीन 'करियर'च यातून निर्माण झाले आहे. निधीसंस्थांच्या या नवयुगात युरोप -अमेरिकेत आता अधिक

सूत्रबद्ध असे देणग्या वितरित करण्याचे कार्य सुरू झाले आहे. आपल्या देणग्यांचा विनियोग योग्य तऱ्हेने व्हावा असे देणगीदारांना वाटत असल्यामुळे, ते आता या विनियोगावरही लक्ष ठेवू लागले आहेत. बिल गेटस् यांनी म्हटले आहे, "पैसे मिळविण्यासाठी जेवढे श्रम करावे लागतात तेवढेच ते पैशाचा विनियोग करण्यासाठीही करावे लागतात."

अलीकडच्या निधीसंस्था आपल्या विचारांचा सांधा आता बदलताहेत. केवळ देणग्या देऊन त्या स्वस्थ राहणार नाहीत. त्यांच्या कामांमध्ये आता अधिक व्यावसायिकता येऊ लागली आहे. देणगी घेणाऱ्या संस्थांची, रक्कम वापरण्याची क्षमता, पद्धती आणि त्यांची देणगीदारांशी तसेच उद्दिष्टांशी असलेली बांधिलकी महत्त्वाची ठरत आहे. निधीसंस्था आता परस्परसंबंधांचे जाळे निर्माण करण्यात रस घेत आहेत. निधीप्राप्त होणाऱ्या संस्थांचे गट बांधताहेत. हे बदल होताहेत कारण आता, खूप मोठा पैसा, परोपकारासाठी -देणग्यांसाठी उपलब्ध होत जाणार आहे. अमेरिकेचेच उदाहरण बोलके आहे. (शिवाय, अशी अभ्यासपूर्ण आकडेवारीही तेथे उपलब्ध आहे !)

बोस्टन कॉलेजचे शेरविश (आणि सहकारी) यांच्या अभ्यासातून भावीकाल चित्र स्पष्ट होत आहे. अमेरिकन श्रीमंतांपैकी ज्यांची मालमत्ता १० लाख डॉलर्सच्या वर आहे (४.९ टक्के कुटुंबे) त्यांनी, १९९७ सालच्या देणगी रकमांपैकी ४२ टक्के इतका वाटा उचलला होता. त्यांतही केवळ ०.२२ टक्के कुटुंबे (यांचे उत्पन्न दशलक्ष डॉलर्सच्या वर होते !) यांचा देणग्यांमधील वाटा १३ टक्के एवढा होता. हीच परिस्थिती मृत्यूपत्राने ठेवलेल्या रकमेबाबत आहे. दोन कोटी डॉलर्सच्यावर ज्यांची मालमत्ता होती त्यांनी आपल्या मृत्यूपत्रांद्वारे ४९ टक्के रक्कम दान दिली आणि फक्त २१ टक्के रक्कम आपल्या मुला-बाळांसाठी ठेवली. बाकीची रक्कम करांपोटी गेली.

शेरविश आणि मंडळींनी दिलेल्या अंदाजानुसार १९९८ ते २०५२ या काळात हस्तांतरित होणारी रक्कम असेल ४१०० अब्ज ते १३६०० अब्ज डॉलर्सच्या घरात ! (ही रक्कम आजच्या संपूर्ण अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या मूल्याच्या चौपट आणि आजच्या जगभरच्या मालमत्तेएवढी भरेल !) श्रीमंतांची श्रीमंती वाढते आहे तशी त्यांची उदारताही वाढते आहे. त्यांच्या जीवनातच ही उदारता आहे असे नाही, तर ती त्यांच्या मृत्यूतही आहे. कारण, १९९५ ते १९९७ या कालावधीत अमेरिकन मालमत्ता ६५ टक्क्यांनी वाढली. पण, वारसांना ठेवलेल्या रकमेत केवळ ५७ टक्केच वाढ झाली. मात्र देणगीच्या रूपाने ठेवलेल्या रकमेत ११० टक्के एवढी वाढ झाली आहे.

(पान क्रमांक ३५ वर पाहावे)

सामाजिक

# स्त्रिया आणि महत्त्वाकांक्षा

आज, विज्ञान -तंत्रज्ञानाच्या या युगात, विविध देशांतील अनेक स्त्रियांनी अनेकविध क्षेत्रांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने कार्य केले आहे. स्त्रियांचा प्रवेश झालेला नाही, अशी क्षेत्रे आता बोटावर मोजावी लागतील ! अर्थात, अशी संधी सगळ्याच देशांमधील सर्वच स्त्रियांना मिळाली आहे वा त्यांनी मिळविली आहे, असेही नाही. आजही बहुतांश स्त्रिया, घर -संसार, मुलांचे संगोपन -शिक्षण इत्यादींमध्येच गुरफटलेल्या दिसतात; आणि ज्या क्षेत्रांत स्त्रिया नोकरी -कार्य करीत आहेत, त्या क्षेत्रांतही त्यांनी सर्वोच्च पदावर जाण्यासाठी विशेष प्रयत्न (अपवाद वगळता) केले आहेत, असेही आढळत नाही. अगदी अमेरिका, युरोपपासून ते भारत, चीनपर्यंत अनेक देशांमध्ये साधारणतः अशीच स्थिती आढळते. एक लक्षात घेण्यासारखा मुद्दा असा की, शिक्षण घेतलेल्या स्त्रियाही घर -संसाराला प्राधान्य देतात. अशिक्षित व अल्पशिक्षित स्त्रियांचा प्रश्न जरा बाजूला ठेवू. पण, सुशिक्षित स्त्रियाही घराबाहेरच्या जगात थोडे मागे राहण्याचा प्रयत्न का करतात ? याचा अर्थ स्त्रियांमध्ये त्यासाठी आवश्यक असलेले शिक्षण व विविध गुण - आवड, चिकाटी, मेहनत, जिद्द, महत्त्वाकांक्षा इत्यादींची कमतरता आहे का ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न मानसशास्त्रातील अभ्यासक ॲना फेल्स यांनी केला आहे. 'डू विमेन लॅक ॲम्बिशन ?' या शीर्षकाखाली त्यांचा एक लेख 'हार्वर्ड बिझिनेस रिव्ह्यू'ने प्रसिद्ध केला आहे. याच विषयावर भारतातील परिस्थितीचा वेध घेण्याचा अल्पसा प्रयत्न 'इकॉनॉमिक टाइम्स'ने केला आहे.

महत्त्वाकांक्षा म्हणजे आपण ज्या क्षेत्रात असू तेथे सर्वोच्चस्थानी जाण्याची तीव्र इच्छा; आणि नुसतीच इच्छा नव्हे तर त्यासाठी करावे लागणारे प्रयत्नही होय. म्हणजे, जास्त वेळ काम करणे, नवनवीन कामांची जबाबदारी घेणे किंवा फिरतीवर जाणे इत्यादी. म्हणजे कुटुंबाला कमी वेळ देणे होय. हे असे करणे बहुतांश स्त्रिया नाकारतात. स्त्रियांना चांगले कार्य करण्यास पोषक वातावरण असलेल्या कार्यालयांमध्येही हीच स्थिती आढळते. असे का व्हावे ? ॲना फेल्स यांनी केलेल्या सर्वेक्षणात स्त्रियांनी अशा प्रश्नांची उत्तरे दिली आहेत.

अनेक स्त्रियांना महत्त्वाकांक्षा हा शब्ददेखील सुखाचा वाटत नाही. त्यांच्या मते, महत्त्वाकांक्षा या शब्दात अहंभाव, स्वकेंद्रित वृत्ती, स्वार्थासाठी इतरांचा उपयोग करून घेण्याचे प्रयत्न, आपलेच महत्त्व (विनाकारण) वाढवून घेण्याचा दृष्टिकोण असे अर्थ दडलेले आहेत. स्त्रियांनी महत्त्वाकांक्षी असले पाहिजे, या विधानापासूनच दूर पळण्याचा प्रयत्न अनेक स्त्रिया करीत असतात. अगदी नोकरी वा व्यवसाय करीत असणाऱ्या स्त्रियादेखील आपण महत्त्वाकांक्षेसाठी काही करीत नाही, तर आपल्या कामाची गरज म्हणून आपण काही पावले उचलतो असे सांगून, (आपली असलेली वा नसलेली) महत्त्वाकांक्षा दडविण्याचा प्रयत्न करतात. अगदी मुलांच्या बाबतीत देखील त्या आपले मुलांप्रतीचे कर्तव्य पार पाडण्याची भूमिका स्वीकारून, मुलांना त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मदत करीत असतात. यात आपल्या मुलांनी अमूक एक करावे, अशी त्यांची महत्त्वाकांक्षा नसते, असे त्या म्हणतात.

याउलट, पुरुषांची भूमिका असते. ते स्त्रियांसारखी विधाने करीत नाहीत व जीवनातील विविध बाबींच्या संदर्भातील आपली महत्त्वाकांक्षा दडवत नाहीत. त्यांच्या मते, महत्त्वाकांक्षा असणे यात काहीच गैर नाही; किंबहुना ती असणे हा जीवनातील आवश्यक व अविभाज्य घटक आहे.

प्रश्न असा आहे की, स्त्रिया आपल्या महत्त्वाकांक्षेबद्दल उघडपणे बोलत का नाहीत ? त्यांना ती दडवावीशी का वाटते ? त्या कशाला घाबरतात ?

याचा शोध घेण्यासाठी ॲना फेल्स यांनी स्त्रियांच्या बालपणात, शालेय व महाविद्यालयीन जीवनातही डोकावण्याचा प्रयत्न केला आहे. मुलगा व मुलगी यांच्यात शारीरिक व मानसिक भेद असले तरी, लहानपणी वाढ होतानाच्या काळात, काही गुण हे दोघांमध्येही सारख्याच प्रमाणात आढळतात, असे त्यांना जाणवले. विशेषतः महत्त्वाकांक्षा ही दोघांमध्येही सारख्याच तीव्रतेने आढळते. बालपणीच्या या मुलींना कथा-कादंबरीकार, अभिनेत्री, फॅशन डिझाईनर, गायिका किंवा देशाचे अध्यक्षपद ही सगळी क्षेत्रे आव्हानाची वाटतात व त्यात त्यांना करियर करण्यातही रस असतो. त्यांच्या मनात दोन गोष्टी स्पष्ट असतात; एक, त्यांना एखाद्या विशिष्ट गोष्टीत प्राविण्य मिळवायचे असते आणि दुसरे, आपले नाव प्रसिद्ध व्हावे असे त्यांना वाटत असते. मुलांमध्येही याच दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात. एखादी गोष्ट आपल्याला व्यवस्थित करता यावी, असे लहान मुलांना वाटत असते व त्यासाठी ते खूप प्रयत्न करतात, असे 'बालमानसा'चा अभ्यास करणारे जीन पियाजे, इरिक एरिकसन इत्यादींनी म्हटले आहे. तसेच आपल्या

चांगल्या कामाला 'मान्यता' (recognition)मिळावी, असे मुलगा व मुलगी दोघांनाही वाटत असते. पण शालेय वा महाविद्यालयीन जीवनात मुलांच्या प्रयत्नांचे जास्त कौतुक होते व त्यांच्याकडे अधिक लक्ष दिले जाते, असे ॲना फेल्स यांना सर्वेक्षणातून आढळले आहे.

मोठे झाल्यानंतर देखील आपल्या कामाला 'मान्यता' मिळावी असे स्त्री - पुरुष दोघांनाही वाटत असते. असे वाटणे, ही माणसाची एक भावनिक गरज आहे. कागन आणि मॉस या दोन अभ्यासकांनी या भावनिक गरजेचा अभ्यास केला आहे. कामाची 'पावती' मिळाल्यानंतर कोणतीही व्यक्ती आपले काम अधिक चांगल्या पद्धतीने करण्याचा अधिक प्रयत्न करते, असे त्यांना आढळले. कामाची 'पावती' मिळणे व अधिक चांगले काम करण्याची जिद्द वा ईर्षा निर्माण होणे, या दोन्ही बाबी परस्परांपासून वेगळ्या करणे शक्य नाही, असेही मत त्यांनी व्यक्त केले आहे. याचा अर्थ असा की, लहानपणापासून मोठे होईपर्यंत स्त्री -पुरुष या दोघांमध्येही सारख्याच प्रमाणात कामाची प्रशंसा व्हावी व आपण आणखी चांगले काम करावे ही ईर्षा असते.

पुरुष असो वा स्त्री, दोघेही बालपणापासून विविध करियरची स्वप्ने बघत असतात. मग प्रत्यक्ष करियर करण्याची वेळ येते, तेव्हा स्त्रिया मागे का पडतात ? शिवाय करियरमध्ये ज्या स्त्रिया यशस्वी होतात त्यादेखील, 'आपली महत्त्वाकांक्षा असे करण्याची होती,' असे का म्हणत नाहीत ? अनेक स्त्रिया आपल्याला योगायोगाने सर्व काही मिळाले, असे मोघम का बोलतात ? आपल्या उल्लेखनीय कामाचा उल्लेखही त्या टाळतात आणि कधीकधी सरळ दुसऱ्या व्यक्तीला किंवा नशीबाला श्रेय देऊन मोकळ्या होतात. अगदी राजकारणात यशस्वी झालेल्या स्त्रिया किंवा वैद्यकीय क्षेत्रात आघाडीवर असलेल्या स्त्रियादेखील असे बोलतात, असे ॲना फेल्स यांनी नमूद केले आहे. आपल्या कर्तृत्वाचे कौतुक वा अभिमान नसावा; किंबहुना, पुरुषांच्या उपस्थितीत स्त्रीने त्याविषयात मागेच राहावे, अशा 'मॅनर्स' स्त्रियांच्या मनावर, लहानपणापासूनच कळत-नकळत बिंबविल्या जातात, असे या अभ्यासातून आढळले आहे. पुरुषांच्या व स्त्रियांच्या ठायी नैसर्गिक, उपजत काही विशिष्ट गुण असतात, ते त्यांच्या पुरुषत्वाचे किंवा स्त्रीत्वाचे दर्शक असतात, असे साधारणतः मानले जाते. त्यामुळे स्त्रियांनी मृदू बोलावे, कठोर भाषेचा वापर करू नये, समजुतदार असावे, सहृदय असावे, आक्रमक नसावे, बालसंगोपन ही तिचीच जबाबदारी आहे, ती तिने योग्य रीतीने पार पाडावी, इत्यादी जे काही अलिखित नियम वा बंधने स्त्रियांवर आहेत, त्यातीलच एक नियम

म्हणजे 'स्त्रियांनी महत्त्वाकांक्षी असू नये,' विशेषतः, पुरुषांच्या समोर स्त्रियांनी नमते घ्यावे किंवा आपले महत्त्व वाढवू नये, असेही एक बंधन स्त्रियांवर असते. त्यातूनच आजच्या सुशिक्षित स्त्रियाही महत्त्वाकांक्षेला तिलांजली देतात असे लक्षात येते. विशेषतः घरकाम व बालसंगोपन या केवळ तिच्याच जबाबदाऱ्या असून तिने त्या पूर्ण केल्याच पाहिजेत, असेही गृहीत धरले जाते. घर सांभाळूनच तिने करियर करावे, असेच येथे अपेक्षित असते. या अशा जबाबदाऱ्या स्त्रियांवर लादल्या जातात, तर कधी त्या नैसर्गिकपणे इतक्या सहजतेने स्त्रियाच स्वतः मान्य करतात की यात काही वावगे आहे, असे स्त्रियांना स्वतःला व समाजालाही कधीच जाणवत नाही. याचा अर्थ, तिच्यातील महत्त्वाकांक्षा ती स्वतःच बाजूला ठेवते असाही होतो.

समजा एक नवविवाहित जोडपे आहे. पती-पत्नी दोघेही सुशिक्षित व नोकरी करणारे आहेत. दोघांनाही आपापल्या क्षेत्रात पुढे जाण्याची संधी आहे. अशावेळी जर पतीला बढतीसाठी किंवा अन्य कारणाने राहते गाव वा देश सोडण्याची वेळ आली तर पतीने, पत्नीचे करियर मोडून ही नवी जबाबदारी स्वीकारावी काय ? पत्नीने पतीसाठी आपले करियर सोडून (समजा तिला नवीन ठिकाणी नवीन करियर मिळेल किंवा नाही हे अनिश्चित असताना) त्याच्याबरोबर जावे काय ? असा प्रश्न ॲना फेल्स यांनी विचारला आहे. अशावेळी स्त्रीनेच पुरुषांना प्रोत्साहन द्यावे, आपण मागे राहावे, अशी एक रीत बनली आहे. अशावेळी पत्नीच्या करियरला महत्त्व देऊन, आपल्या करियरची संधी सोडणारे किती पुरुष आढळतील ?

**भारतातील परिस्थिती**

स्त्रियांची महत्त्वाकांक्षा व करियरच्या संदर्भात भारतातील परिस्थितीचा आढावा इकॉनॉमिक टाइम्सने घेतला आहे. त्यांना असे आढळले की, अनेक उच्चशिक्षित स्त्रियाही मुलांच्या संगोपनासाठी आपले करियर बाजूला ठेवतात. उच्चशिक्षणासाठी अतिशय मानाच्या समजल्या जाणाऱ्या अहमदाबादच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट' (आय.आय.एम) या संस्थेतून पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या आणि महाविद्यालयीन जीवनात महत्त्वाकांक्षी असलेल्या अनेक स्त्रियांनी, लग्नानंतर आपली महत्त्वाकांक्षा व करियर बाजूला ठेवून अपत्यसंगोपनाला प्राधान्य दिले आहे. आजही ज्या स्त्रिया मोठ्या कंपन्यांमध्ये उच्च पदावर आहेत, त्यादेखील वेळप्रसंगी 'घरालाच जास्त महत्त्व देऊ,' असेच मत व्यक्त करतात. घरकाम, अपत्य संगोपन व नोकरीतील काम वा ताण-तणाव यात स्त्रियांच्या मनाची फार कुतरओढ होते; त्यामुळे कधी नाईलाजाने तर कधी स्वखुशीने

त्या करियरबाबतची महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवून घराला महत्त्व देतात. (त्यातल्या त्यात भारतात, डॉक्टर, शिक्षिका वा प्राध्यापक महिलांना करियर करणे सोयीचे जाते, असे दिसते.) यावर मार्ग काय, या प्रश्नाच्या उत्तरात उच्चपदस्थ स्त्रियांनी म्हटले आहे की, कंपन्यांनी स्त्रियांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना सहकार्य केल्यास काही प्रश्न सुटू शकतात.

### स्त्रियांनी काय करावे ?

जुन्या काळाच्या तुलनेत आज मात्र ही परिस्थिती बऱ्याच प्रमाणात बदलली आहे. स्त्रियांना विविध क्षेत्रांत समान संधी मिळत असून त्याचा फायदा अनेक स्त्रिया घेत आहेत, तरीही महत्त्वाकांक्षेबाबत त्या अजूनही उदासीनच आहेत. म्हणून 'महत्त्वाकांक्षे'बाबत 'महत्त्वाकांक्षी' कसे व्हावे, याबाबत ॲना फेल्स यांनी (अमेरिकेतील समाजाच्या दृष्टिकोणातून) काही विचार मांडले आहेत. स्त्रियांनी राजकीयदृष्ट्या संघटित व्हावे, असा त्यांचा पहिला सल्ला आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना इतर स्त्रियांकडून कामाची पावती व पाठिंबा मिळणे गरजेचे आहे. पाळणाघरांमधून वा बालसंगोपनाला महत्त्व देणाऱ्यांकडून आपल्या मुलांची योग्य काळजी घेतली जाते, हे स्त्रियांनी अनुभवल्यानंतर अनेक स्त्रिया अनेक क्षेत्रांत पुढे जाऊ शकतील असे त्यांना वाटते. दुसरा, एकाच स्त्रीने पत्नी, गृहिणी, आई, नोकरी असल्यास उत्तम कर्मचारी वा इतर काही अशा अनेक आघाड्यांवर यशस्वी व्हावे, यासाठी स्त्रीने आपला प्राधान्यक्रम ठरवून त्याप्रमाणे कृती करावी. तिसरा सल्ला असा की, आपल्या चांगल्या कामांना पावती मिळावी ('स्त्री' म्हणून नव्हे तर एक 'कर्मचारी' म्हणून) याची काही योजना आखली तर त्यांना आणखी चांगले काम करण्यास प्रोत्साहन मिळेल. चौथा सल्ला - नोकरीच्या ठिकाणी माणुसकीच्या नात्याने (केवळ 'स्त्री' म्हणून नव्हे) सर्वांशी चांगले संबंध राहण्यासाठी विशेष प्रयत्न करणे, पाचवा सल्ला - असे काम करण्यास आपल्याला फार उशीर झाला असे समजू नये.

सरतेशेवटी ॲना फेल्स यांनी असेही नमूद केले आहे की, आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर म्हणजे साधारणतः वयाच्या चाळीशी-पंचेचाळिशीनंतर अनेक स्त्रियांचे करियर उत्तम रीतीने बहरून येते, असे त्यांना सर्वेक्षणात आढळले.

*(संदर्भ - 'हार्वर्ड बिझिनेस रिव्ह्यू' - एप्रिल २००४मधील ॲना फेल्स यांचा लेख, , त्या मानसशास्त्रज्ञ असून न्यूयॉर्कमधील वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापिका आहेत. १० सप्टेंबर २००४च्या 'इकॉनॉमिक टाइम्स' च्या पुरवणीतील पूजा कोठारी यांचा लेख.)*

आर्थिक

# जागतिकीकरणात हवा 'समतोल'

चालू शतकात, जागतिकीकरणाला गती आली आहे. सगळी राष्ट्रे या ना त्या मार्गाने जागतिकीकरणाकडे झुकत असल्याचे एक सर्वसाधारण चित्र आहे. याचबरोबर जागतिकीकरणाच्या विरोधातही विविध देशांमध्ये काही गट उभे राहिले आहेत. 'वर्ल्ड सोशल फोरम' या नावाखाली ते एकत्र आले आहेत. दक्षिण आशियात 'वर्ल्ड सोशल फोरम'चे कार्य करणारे व जागतिकीकरणाच्या, त्यातही बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विरोधात उभे ठाकलेले, फिलिपाईन्स युनिव्हर्सिटीमधील समाजशास्त्राचे प्रोफेसर वाल्डन बेलो यांना अलीकडेच (डिसेंबर २००३) 'द राईट लाईव्हलीहुड ॲवार्ड' हा नोबेल पुरस्काराइतकाच महत्त्वाचा समजला जाणारा मानाचा पुरस्कार मिळाला आहे. नागरिकांच्या हितासाठी जागतिक पातळीवर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती वा संस्थांना हा पुरस्कार देण्यात येतो. 'जागतिकीकरण व बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आर्थिक साम्राज्य' या विषयाच्या परिणामांबाबत, नागरिकांचे प्रबोधन केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर त्यांनी एक छोटेसे भाषण केले. तसेच त्यांची एक मुलाखतही कलरलाईन्स या मासिकाने प्रसिद्ध केली आहे. यांमधून पुढे आलेले त्यांचे विचार येथे मांडले आहेत.

जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाल्यानंतर जागतिकीकरण हेच जगाचे भविष्य आहे, असे म्हटले जाऊ लागले होते. तेव्हा जागतिकीकरणाला विरोध करणाऱ्यांना हिणविले जात होते. औद्योगिक क्रांतीच्या काळात यंत्रांना विरोध करणारे एकाकी पडले; आणि यंत्रयुग रोखणे कोणाला शक्य झाले नाही. तशीच वेळ जागतिकीकरणाला विरोध करणाऱ्यांवर येईल, असेही म्हटले गेले. जागतिकीकरणामुळे समृद्धीचे युग अवतरणार आहे आणि यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्या व बाजारयंत्रणा साहाय्यभूत ठरणार आहेत, असे अनेकांना वाटत होते. असे असताना जागतिकीकरणाला विरोध करणे हा करंटेपणा आहे, असेही म्हटले गेले. पण तरी जागतिकीकरणाचे विरोधक आपल्या मतावर ठाम होते. १९९०च्या दशकात, भांडवलशाहीचे प्रतीक असणाऱ्या अमेरिकेत तेजीचा काळ होता; तरी खुली अर्थव्यवस्था, मुक्त व्यापार व

मोठ्या कंपन्यांची नफेखोरी यांमुळे देशांतर्गत व देशादेशांमधील असमानता वाढणारच आहे आणि आर्थिक संकटे व गरिबीच यातून निर्माण होणार आहे, अशी खात्री विरोधकांना वाटत असल्याने ते आपल्या भूमिकेवर ठाम होते.

यानंतर १९९७ मध्ये आशियात आर्थिक संकट निर्माण झाले. यामुळे थायलंड व इंडोनेशिया या देशांमधील लाखो नागरिक एकाएकी अतिशय अडचणीत आले. संपूर्ण जगाच्याच अर्थव्यवस्थेवर या संकटाचा मोठा परिणाम झाला. या संकटानंतर अनेकांचे डोळे उघडले. अमेरिकेचे वर्चस्व असलेल्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेने लादलेली मुक्त व्यापार, खुल्या अर्थव्यवस्थेची धोरणे या देशांना उपयुक्त ठरली नाहीत. या धोरणांनी त्यांना आर्थिक प्रगती, समृद्धी व समानता दिली नाहीच; उलट त्यांची अर्थव्यवस्था एका जागी कुंठित होऊन त्यांना गरिबी व असमानता यांनाच सामोरे जावे लागले.

एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीला, २००१ मध्ये, अतिरेक्यांनी अमेरिकेवर जो हल्ला केला, त्याचे एक कारण अमेरिकेचे जगावरील आर्थिक वर्चस्व हेही होते. हे वर्ष आणखी एका घटनेसाठी महत्त्वाचे ठरले. ते म्हणजे, नव्या आर्थिक धोरणाचे अपत्य म्हणून ज्याकडे बघितले गेले, त्या अर्जेन्टिनामधील अर्थव्यवस्थेचा डोलारा कोसळला. अमेरिकेतील गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले. आर्थिक क्षेत्र अडचणीत सापडले आणि बेरोजगारी वाढू लागली.

जागतिक पातळीवर भांडवलशाही अडचणीत येऊ लागली तसतशी या नवआर्थिकवादाच्या विरोधात, रस्त्यांवर येणाऱ्या नागरिकांची संख्याही वाढू लागली. डिसेंबर १९९९ मध्ये सिएटल येथे पन्नास हजारावर नागरिकांनी निदर्शने केली. व्हेनेझुएला, अर्जेन्टिना, ब्राझील आणि इक्वेडोर येथे नवआर्थिकवादाला विरोध करणाऱ्या व्यक्ती राजकारणात पुढे आल्या. कॅनकून येथे झालेल्या परिषदेच्या वेळीही अनेकांनी निदर्शने केली. यावेळी नवआर्थिकवादाच्या विरोधात, कोरियातील शेतकऱ्याने केलेली आत्महत्या एक बोलकी घटना ठरली. मियामी येथील परिषदेतही अमेरिकेच्या नवआर्थिकवादी धोरणांना माघार घ्यावी लागली. 'फ्री ट्रेड एरिया ऑफ अमेरिकाज' (FTAA) असे करण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नांना जोरदार विरोध झाला.

'वर्ल्ड सोशल फोरम' अंतर्गत एकत्र येणाऱ्या विविध देशांमधील नागरी संघटना, न्याय व समानता या दोन तत्त्वांच्या आधारे ही वैचारिक लढाई लढताहेत. या संघटनांचे आणखी एक उद्दिष्ट आहे, ते म्हणजे जगात शांतता प्रस्थापित करण्याचे.

जागतिकीकरणाचे समर्थन करणारी भूमिका जगात शांतता नांदावी यासाठी साहाय्यभूत ठरेल, असेही त्यांना वाटत नाही. जसजसे जागतिकीकरण व नवआर्थिकवाद सर्व देशांमध्ये पसरत जाईल, तसतसे त्याच्या सामाजिक व आर्थिक परिणामांमुळे सामाजिक सुरक्षा व आर्थिक स्थैर्य धोक्यात येऊन अशांतता वाढण्याचीच शक्यता अधिक आहे. नैसर्गिक संसाधनांवर नियंत्रण, बाजारपेठवरील वर्चस्व असे एक ना अनेक मुद्दे यातून पुढे येत आहेत. जागतिकीकरणाच्या विरोधकांचे मुद्दे खरे ठरताहेत हे म्हणण्यास नागरिकांच्या या गटाला आनंद वाटत नाही, कारण यामुळे अनेक नागरिक अडचणीत आलेले असतात. आणि जागतिकीकरणामुळे ज्या नागरिकांचे नुकसान होत आहे, त्यांच्यासाठी कार्य करणे हे खरे गरजेचे ठरते. जागतिक शांततेसाठी अशी आमची भूमिका तयार होत गेली. त्यामुळे इराकवर युद्ध लादण्याच्या अमेरिकेच्या भूमिकेच्या विरोधात असेच काही गट एकत्र आले. या गटाला हे युद्ध रोखता आले नाही तरी अशा आंतरराष्ट्रीय विषयांच्या संदर्भात जगात 'सुपरपॉवर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशाच्या विरोधात नागरिक एकत्र येऊ शकतात, ही देखील एक मोठी गोष्ट मानली गेली.

## 'अजागतिकीकरणा'कडे

अशा सर्व घडामोडींमधून जागतिक नागरी समाज एकत्र येऊन जागतिकीकरणाला पर्याय काय यावरही चर्चा झाली. त्यांच्यातर्फे आता 'अजागतिकीकरण' (Deglobalization) व्हावे, असा प्रयत्न करण्यात येत आहे. 'अजागतिकीकरण' म्हणजे जागतिकीकरणात मध्यवर्ती भूमिका बजावणाऱ्या जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक व्यापार संघटना यांसारख्या संस्थांच्या मार्फत होणारे आर्थिक व्यवहार बंद करणे. आणि सर्व देशांचे हित जपले जावे, या दृष्टिकोणातून संयुक्त राष्ट्रसंघाच्या विविध संस्था व एजन्सी यांच्या नियमनांच्या अंतर्गत बहुदेशीय आर्थिक प्रशासन यंत्रणा कार्यान्वित करणे. या यंत्रणांमध्ये लॅटिन अमेरिकेतील 'मर्कोसूर' (Mercosur) किंवा आशियातील 'एसिआन' (ASEAN) यांसारख्या संस्थांचा सहभागही घेता येईल.

'अजागतिकीकरण' व्हावे यासाठी एखादी मध्यवर्ती संघटना वा संस्था अशी स्थापन करण्यात आलेली नसली तरी तसे काही होऊही शकेल. सर्व देशांचा जास्तीत जास्त सहभाग कसा घेता येईल याचा विचार करण्याची प्रक्रिया सुरू होणे व हळूहळू ती कार्यान्वित होणे, याला 'अजागतिकीकरणा'ची सुरूवात मानता येईल. हे असे व्हावे यासाठी जी -२१ गटातील राष्ट्रांची चर्चा चालू आहे. या राष्ट्रांमध्ये फूट पाडण्याचेही

प्रयत्न अमेरिका करीत आहे. कारण, ब्राझील, चीन, भारत आणि दक्षिण आफ्रिका हे देश प्रामुख्याने व यांच्या सहकार्याने इतर काही देश जर एकत्र आले तर ही घटना अमेरिका व युरोपसाठी डोकेदुखी ठरू शकते. कारण, अमेरिकेच्या नेतृत्वाखालील जागतिकीकरणाला पर्याय निर्माण करण्याचे कार्य हे देश करू शकतात.

'अजागतिकीकरणा'चा पर्याय लवकर निर्माण करण्याची गरज आज जाणवते आहे. कारण, जागतिकीकरणामुळे निर्माण होणारी अस्थिरता, संकटे वा त्यामुळे निर्माण झालेली निराशा यातून जगाचे काहीही भले होणार नाही, असे दिसते. या अस्थिरतेचा फायदा अतिरेकी गट, राजकीय नेते आणि कशावरच विश्वास नसलेले समाजकंटक घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण, 'अजागतिकीकरण' करताना जगात, अर्थव्यवहारात किंवा पर्यावरणीय व तत्सम क्षेत्रांत समतोल राहिला पाहिजे, हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे जगाचे हित, हे 'समतोला'कडे जाण्यात आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. *(संदर्भ - इंटरनेट, कलरलाईन्स , स्प्रिंग २००४, वाल्डन बेलो यांची या विषयातील १२ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. 'डिग्लोबलायझेशनः आयडियाज फॉर न्यू वर्ल्ड इकॉनॉमी' हे त्यांचे पुस्तक अलीकडेच प्रसिद्ध झाले आहे.)* ■■

## अमेरिकेतील निवडणूक व जागतिक नागरिक

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या आत्ताच्या निवडणूकीसाठी जगातील सर्व नागरिकांना मतदानाचा हक्क असावा, अशी भूमिका (गंमतवजा गंभीर सूचना) जोनाथन फ्रीलँड यांनी 'जागतिक नागरिक' म्हणून मांडली आहे. अमेरिकेचे निर्णय संपूर्ण जगावर परिणाम करणारे असतात, हे या भूमिकेमागील महत्त्वाचे कारण आहे, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. अमेरिकेने पुकारलेला दहशतवादाविरूद्धचा लढा असो वा इराकवरील हल्ला असो, जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमातून झालेले जागतिकीकरण असो वा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी किंवा जागतिक बँकेमार्फत इतर देशांवर लादण्यात आलेले आर्थिक निर्णय असो, हे सर्व निर्णय जागतिक नागरिकांवर विविध प्रकारे परिणाम करीत असतात, असे त्यांनी म्हटले आहे. हा अंक वाचकांच्या हाती पडेस्तोवर अमेरिकेच्या सर्वोच्च पदाची - राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक पार पडली असली तरी, कदाचित अमेरिकेच्या पुढील निवडणुकीपर्यंत आपल्याला त्यावर विचार करता येईल !

*(संदर्भ - गार्डियन न्यूजपेपर्स लिमिटेड, द हिंदू)* ■■

# चीनमधील औद्योगिक क्षेत्रातील 'ग्वांक्झी'

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चिनी वस्तूंचा सुळसुळाट झाला असला आणि चीनने आपल्या देशात परकीय गुंतवणूकदारांना आकर्षित केले असले तरी चीनमध्ये व्यापार -उद्योग करून मोठ्या प्रमाणावर नफा मिळविणे हे, सुरूवातीच्या काळात परदेशांमधील अनेक कंपन्यांना शक्य झाले नाही. मग चीनमधील मोठी बाजारपेठ आपल्याला मिळावी, या उद्देशाने चीनमध्ये प्रवेश करणाऱ्या परदेशांमधील अनेक कंपन्या चीनमधील औद्योगिक क्षेत्राचा अभ्यास करू लागल्या. यातील काही गोष्टी त्यांना अनुभवाने कळल्या. चीनमधील 'ग्वांक्झी' ही पद्धत अशीच अनेक कंपन्यांना अनुभवातून लक्षात आली. 'ग्वांक्झी' म्हणजे 'वैयक्तिक संबंध' (personal connection) होय. चीनमध्ये, सामाजिक व औद्योगिक क्षेत्रात, वैयक्तिक संबंधांना खूप महत्त्व आहे. येथील अनेक कामे वैयक्तिक संबंधांना महत्त्व देऊन सहजपणे करता येतात.

औद्योगिक क्षेत्रात 'ग्वांक्झी'मुळे कसे काम होते, हे काही उदाहरणांवरून लक्षात येईल. विशेषतः औद्योगिक कंपनीतील विक्री विभाग व कंपनीसाठी विविध प्रकारच्या वस्तू, सामान विकत घेणारा खरेदी विभाग यांच्यासाठी ही पद्धत उपयुक्त ठरत असते. म्हणजे, एखाद्या कंपनीचा कर्मचारी, विक्री प्रतिनिधी म्हणून विक्रीसाठी बाहेर फिरत असताना, त्या कंपनीची उत्पादने तर विकेलच; शिवाय त्याच वेळी, त्याच ठिकाणी, स्थानिक स्पर्धक कंपन्यांचीही उत्पादने विकू शकेल. हे 'ग्वांक्झी'मुळे शक्य होते. समजा त्या प्रतिनिधीचे संबंध स्पर्धक कंपनीशी चांगले असतील तर तो, ते संबंध तसेच चांगले ठेवण्यासाठी असे करू शकतो. यात नैतिकदृष्ट्या काहीही गोंधळ त्याच्या मनात निर्माण होत नाही. 'ग्वांक्झी' म्हणजे वैयक्तिक संबंध हे त्या कंपनीची नव्हे तर कर्मचाऱ्याची वैयक्तिक बांधिलकी व मालमत्ता असते. या संबंधांवर म्हणजे मालमत्तेवर नफा मिळविण्याचे स्वातंत्र्य त्याला असते. याचा कंपनीच्या कामाशी काही संबंध नसतो आणि हे संबंध त्या कर्मचाऱ्याने आपल्या नोकरीत उघड करावेत, अशी अपेक्षा वा बंधन नसते. म्हणजे या वैयक्तिक संबंधांमुळे एका नोकरीत असताना, त्यावेळेतच (मालकाच्या खर्चात) कर्मचाऱ्याला जास्त पैसे मिळविता येतात आणि

आपल्या संबंधातील दुसऱ्या व्यक्तीला (अप्रत्यक्षपणे दुसऱ्या उद्योगाच्या मालकाला) मदत करून हे संबंध आणखी वाढविता येतात, म्हणजे 'ग्वांक्झी'ला आणखी बळकटी आणता येते. त्या कर्मचाऱ्याने स्वतःच्या वेळेच्या गणितानुसार ही कामे करायची असतात. 'ग्वांक्झी'मध्ये दुसऱ्याने केलेल्या मदतीची जाणीव ठेवणे आणि त्याची परतफेड करणे हे अपेक्षितच असते. ही परतफेड होणे हेही नैतिकदृष्ट्या मान्यताप्राप्त असून ते गरजेचे ठरते. म्हणजे दोन्ही बाजूच्या संबंधितांची इच्छा असल्यास 'ग्वांक्झी'चे चक्र चालूच राहू शकते. ('ग्वांक्झी'चा उपयोग करून मोठे उद्योगपती झालेले विन्सेंट लो हे चीनमध्ये 'द किंग ऑफ ग्वांक्झी' या नावाने प्रसिद्ध झाले आहेत !)

चीनमध्ये सर्वत्र पसरलेल्या व प्रभावी ठरलेल्या 'ग्वांक्झी'चा फायदा आपल्याला होतो असे अनेक कंपन्यांना वाटत असते. पण कधीकधी त्यांचे नुकसानही यातून होत असते. म्हणून काही कंपन्यांनी यावर उपाय शोधले आहेत. ते असेः (१) स्पर्धा निर्माण करणे -अल्काटेल या बहुराष्ट्रीय कंपनीचे अनेक पुरवठादार म्हणजे या कंपनीच्या शेअरहोल्डर्सची मालकी असणारे उद्योग होते. त्यामुळे या कंपनीने एक युक्ती शोधून पुरवठादारांसाठी लिलाव पद्धत अवलंबिण्यास सुरूवात केली. ग्वांक्झीला विरोध न करता अशा प्रकारचे संबंध कंपनीच्या हिताच्या आड येऊ नये यासाठी कंपनीने प्रयत्न केले. (२) कर्मचाऱ्यांची जबाबदारी बदलती ठेवणे - कंपनीबाहेर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे काम परस्परांमध्ये बदलत ठेवण्याला ॲलरगन सारख्या कंपन्यांनी प्राधान्य दिले. पण कर्मचाऱ्यांना आपले काम शिक्षा म्हणून किंवा ग्वांक्झी रोखण्यासाठी बदलण्यात आले असेही वाटायला नको, याची काळजी त्यांना घ्यावी लागली. (३) गट संपर्क - एकाच व्यक्तीकडे एका ठराविक उद्योगाला वा व्यक्तीला भेटण्याचे काम न देता कंपनीचा एक गट - टीम म्हणून त्या उद्योगाच्या संपर्कात राहण्याची योजना काही कंपन्यांनी राबविली. (४) कर्मचाऱ्यांमधील निष्ठा वाढविणे - आपण नोकरी करीत असलेली कंपनी कर्मचाऱ्यांना आपली वाटावी, कंपनीच्या प्रती निष्ठा वाढावी म्हणजे ग्वांक्झीचे प्रमाण कमी होईल, अशा योजना कंपन्यांनी राबविल्या. यात कर्मचाऱ्यांना सहकुटुंब सहपरिवार जेवायला बोलावणे इ. योजना राबविण्याच आल्या.

चीनमध्ये व्यापार - उद्योग करताना ग्वांक्झीचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने करणे हे एक आव्हानाचे काम ठरते.

*(संदर्भ - हावर्ड बिझिनेस रिव्ह्यू -एप्रिल २००४मधील मार्केटिंग विषयाचे प्रोफेसर विल्फाईड वॅनोकर यांचा लेख)*

■■

सांस्कृतिक

# फ्रान्समधील मुस्लिम : 'हिजब'च्या गाठीची गुंतागुंत

गेल्या काही वर्षांमध्ये जागतिकीकरणावर जशी विविध देशांमध्ये दोन्ही बाजूंनी चर्चा होत आहे, त्याप्रमाणे इस्लाम मधील विविध रूढी व परंपरा आणि संबंधित देशांमधील राजकीय व सामाजिक व्यवस्था यांच्यासंबंधीही बरीच चर्चा होत आहे. मुस्लिम लोकसंख्या अनेक देशांमध्ये पसरलेली असल्याने मुस्लिम समाजाविषयीची चर्चा व्यापक होत चालली आहे. त्यामुळे एखाद्या देशातील घटनेचे पडसाद इतरत्रही उमटत आहेत, असे आढळते. अलीकडे अशीच एक घटना घडली आहे.

फ्रान्समध्ये मुस्लिम स्त्रियांच्या 'हिजब'ला (कान व कपाळ झाकून घेणारा डोक्याला बांधायचा मोठा रुमाल) बंदी घालण्याचे कायद्याने ठरविण्यात आले; आणि याचे पडसाद इराकमध्ये उमटले आहेत. फ्रान्सच्या सरकारला, या निर्णयाचा धक्का बसावा म्हणून, इराकमध्ये वार्तांकनासाठी आलेल्या फ्रान्समधील दोन पत्रकारांचे अपहरण 'इस्लामिक आर्मी ऑफ इराक' या गटाने अलीकडेच केले आहे. फ्रान्सने 'हिजब'वरील बंदी दूर करावी अशी त्यांची मागणी आहे. या गटाने, यापूर्वी, इटालियन पत्रकार एन्झो बाल्डोनी यांची हत्या केली आहे. फ्रान्समधील सरकारने यासंबंधी सावध प्रतिक्रिया व्यक्त केली असून पत्रकारांच्या सुटकेसाठी राजकीय प्रयत्न सुरू केले आहेत. मात्र अद्याप या पत्रकारांचा ठावठिकाणा लागलेला नाही.

फ्रान्समधील मुस्लिम मुलींनी 'हिजब' बांधायचा किंवा नाही यावरून फ्रान्समध्ये गेले काही महिने बरेच मोठे वैचारिक वादळ झाले. फ्रान्समध्ये सुमारे ५० लाख मुस्लिम आहेत. गेल्या वर्षी तेथील दोन शाळकरी मुलींनी 'हिजब' बांधला; म्हणून त्यांना शाळेतून निलंबित करण्यात आल्यानंतर हा वाद निर्माण झाला होता. (यासंबंधीचा लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या जानेवारी २००४च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे.) फ्रान्स हा निधर्मी देश असल्याने तेथील सरकारने (सध्याचे अध्यक्ष जॅक्वस शिरॅक यांनी) यावर आयोग नेमला. बरीच चर्चा होऊन अखेरीस सर्व धर्मांच्या नागरिकांनी, सार्वजनिक ठिकाणी, धर्माचे प्रदर्शन करणारी वा स्तोम माजविणारी विविध चिन्हे वापरू नयेत असा निर्णय सरकारने घेतला. यासंबंधीचा कायदा करण्यात येऊन त्याद्वारे 'हिजब'

बांधण्यावर बंदी घालण्यात आली व अलीकडेच शाळा सुरू होण्याच्या काळात, त्याची अंमलबजावणी करण्यात येऊ लागली आहे.

खरे तर, इराकवर हल्ला करण्याच्या अमेरिकेच्या निर्णयाला फ्रान्सने विरोध केला होता. त्यामुळे हा देश मुस्लिम देशांच्या विरोधात नाही, अशी त्याची प्रतिमा तयार झाली होती. पण 'हिजब'वर बंदी घालण्याच्या निर्णयाला बैरूत, काईरो, तेहरान, गाझा आणि अम्मान अशी काही शहरांमध्ये विरोध करण्यात आला होता व त्याविरूद्ध बुरखा घातलेल्या महिलांनी निदर्शनेही केली होती. फ्रान्सचा हा निर्णय म्हणजे इस्लामवर हल्ला असे मानले जाईल की काय, अशीही फ्रान्सला शंका होती. या पार्श्वभूमीवर, फ्रान्सच्या दोन पत्रकारांची सुटका करावी, यासाठी मुस्लिम देश फ्रान्सला कितपत पाठिंबा देतील असाही प्रश्न फ्रान्सच्या सरकारसमोर होता. पण काही मुस्लिम देशांनी व पॅलेस्टाईनच्या हमास या संघटनेने देखील फ्रान्सच्या विनंतीला मान दिला आहे. अर्थात, 'इस्लामिक आर्मी ऑफ इस्लाम'वर कुणाचा प्रभाव आहे किंवा नाही, याचा अंदाज फ्रान्सला आलेला नाही. तरी पत्रकारांच्या सुटकेची फ्रान्सला आशा आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर मात्र फ्रान्सने इस्लामबाबत सांभाळून राहावे, अशी सूचना फ्रान्सला करण्यात आली आहे. दरम्यान, फ्रान्समधील काही मुस्लिम संघटनांनी अपहरणाचा निषेध केला आहे.

'हिजब'वरील बंदीबाबत मात्र फ्रान्समधील मुस्लिमांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे. 'युनियन ऑफ फ्रेंच इस्लामिक ऑर्गनायझेशन्स'ने म्हटले आहे की, मुस्लिम मुलींनी आपल्या आवडीचा पोशाख घालून शाळेत जावे. आणि 'हिजब' घातलेल्या ज्या मुली कोणत्याही प्रकारे अडचणीत येतील त्यांना हरप्रकारे मदत करण्याची तयारी या संघटनेने दर्शविली आहे. काहींच्या मते हा नियम सर्व धर्मांना लागू करण्यात आलेला नाही, त्यामुळे अजूनही चर्चेला जागा आहे. काही फ्रेंच अधिकाऱ्यांच्या मते, या बंदीचा फायदा घेऊन मुस्लिम संघटना फ्रान्समध्ये अशांतता, अस्थिरता निर्माण करण्याचाही प्रयत्न करू शकतील. या सर्व घडामोडी लक्षात घेऊनही फ्रान्सच्या सरकारने 'हिजब'वरील बंदी कायम ठेवली आहे. मात्र, ज्या मुली 'हिजब' घालतील त्यांच्याशी व त्यांच्या पालकांशी संवाद साधण्याचे ठरविले आहे. 'सरकारचा हा निर्णय इस्लामच्या विरोधातील नव्हे, तर निधर्मीपणाची फ्रेंच तत्त्वे व परंपरा यांच्याशी मेळ राखण्याकरिता घेण्यात आला आहे,' अशी सरकारची भूमिका असल्याचे त्यांना सांगण्यात येणार आहे. यासाठी विविध विषयांच्या अभ्यासकांच्या लेखांचा आधारही घेण्यात आला आहे.

*(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट, २८ ऑगस्ट व ४ सप्टेंबर २००४, इंटरनेट)* ■■

औद्योगिक

# जागतिकीकरण व वस्त्रोद्योग: चीन व भारताला फायदा !

जागतिकीकरण व खुला व्यापार या चक्रात आता अनेक देश सापडू लागले आहेत. 'जागतिक व्यापार संघटने'च्या नियंत्रणाखाली होत असलेल्या व्यापार - उद्योगाच्या या प्रक्रियेत काही देशांचे नुकसान होत आहे; तर काही देशांना फायदाही होतो आहे. याच प्रक्रियेतून, भारत व चीन या दोन देशांचा मोठा फायदा होऊ शकेल, असे काही तरी वस्त्रोद्योगाच्या क्षेत्रात घडते आहे.


जागतिक पातळीवर, सुमारे ५०० बिलियन अमेरिकन डॉलर्स एवढी मोठी उलाढाल असणाऱ्या वस्त्रोद्योगाचे नियंत्रण करणारा, 'मल्टीफायबर अरेंजमेंट' असा एक करार आहे. या करारातंर्गत वस्त्र व तयार कपडे निर्यात करणाऱ्या देशांना एक ठराविक कोटा देण्यात आला व तेवढीच निर्यात त्यांना करता येत होती. उरलेली निर्यात करण्याचा मार्ग इतर देशांना उपलब्ध होता. त्यामुळे निर्यातीवर कोण्या एका देशाची मक्तेदारी न राहता, इतर काही देशांना या निर्यातीत सहजपणे प्रवेश करता येत होता. आता या वर्षाअखेरीस (३१ डिसेंबर २००४) हा करार संपुष्टात येणार आहे. त्यामुळे कोणत्याही देशाला कितीही मोठ्या प्रमाणावर निर्यात करता येणार आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या उरूग्वे येथे झालेल्या चर्चेच्या वेळी हा करार संपविण्याचे ठरविण्यात आले; कारण हा करार खुल्या व्यापाराच्या संकल्पनेच्या विरोधात आहे, असे जागतिक व्यापार संघटनेच्या अनेक सदस्य राष्ट्रांना वाटले. पण या करारामुळे ज्या देशांचा निर्यातीत शिराकाव झाला होता, असे काही देश आता अडचणीत (उदा -बांगलादेश व नेपाळ, यासंबंधीचा लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या फेब्रुवारी २००४ च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे.) येणार असून त्यांनी मात्र, 'हा करार रद्द करू नये, उलट त्याची मुदत आणखी चार वर्षांनी वाढवावी (२००८ पर्यंत),' अशी विनंती संघटनेकडे केली आहे.

### चीन व भारताचा फायदा

'मल्टीफायबर अरेंजमेंट' हा करार रद्द झाल्याचा फायदा, चीन व भारत या देशांमधील वस्त्रोद्योगाला होणार आहे. सर्वात जास्त फायदा चीनला होणार आहे कारण, चीनमध्ये कापसाचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर होते; तसेच तेथे अतिशय

स्वस्तात चांगल्या दर्जाचे तयार कपडे व वस्त्रनिर्मिती केली जाते. जागतिक व्यापार संघटनेच्या अहवालानुसार, अमेरिकेकडे होणाऱ्या तयार कपडे व वस्त्राच्या एकूण निर्यातीमधील चीनचा वाटा, इसवीसन २००२ मध्ये १६ टक्के होता; तो २००५ मध्ये ५० टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. युरोपमधील चीनचा निर्यातीचा वाटा वाढून तो २० टक्क्यांवरून (२००२) २९ टक्क्यांवर (२००५) पोचण्याची शक्यता आहे. या निर्यातीमध्ये, चीन खालोखाल दुसरा क्रमांक भारताचा लागणार असून २००२मध्ये, अमेरिकेकडे होणाऱ्या निर्यातीत भारताचा वाटा ४टक्के होता; तो २००५मध्ये १५टक्क्यांवर पोचेल, असा अंदाज आहे. युरोपकडे होणारी भारताची निर्यात ५ टक्क्यांवरून (२००२) ९ टक्के (२००५) एवढी वाढेल, असे अहवालात म्हटले आहे. (खालील आलेख पाहावा.)

### अमेरिकेच्या बाजारपेठेतील भारत, चीन व इतर देशांचा वाटा




वस्त्रोद्योगातील चीनची निर्यात वाढू शकते; कारण, चीनमध्ये या उद्योगाशी संबंधित पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध आहेत. कच्चा माल (कापूस) मुबलक प्रमाणात आहे आणि कामगार कुशल असूनही श्रम फारसे महाग नाहीत. या सर्व बाबींमुळे कापडउद्योगातील अनेक कंपन्या चीनमध्ये कारखाने उभारण्यास उत्सुक आहेत. पण चीनमधील प्रशासनाकडून त्यांना परवानगी मिळालेली नाही. याला काही कारणे आहेत. एक कारण असे की, अलीकडे कापडउद्योगांतील कामगारांच्या वेतनाबाबत

काही प्रश्न निर्माण होत आहेत. चीनमध्ये कामगारांना आठवड्याचे सातही दिवस काम केलेले चालू शकते. पण उद्योजकांची अपेक्षा अशी असते की, जेव्हा मागणी जास्त असते तेव्हा कामगारांनी जास्त काम करावे. पण जास्त वेळ काम करण्याबाबत मोबदला देण्याच्या संदर्भात चीनमध्ये काही वाद आहेत. त्यातच ग्रामीण भागातील कामगार स्थलांतर करण्यास उत्सुक नसले तर कामगारांची चणचण भासते. त्यामुळे एकीकडे काम जास्त, आणि कामगार कमी, अशी स्थिती होते. तसेच कारखान्यांमध्ये कामगारांसाठी सर्व सोयी, त्यांची सुरक्षा व कामास योग्य वातावरण असतेच असे नाही. शिवाय हे कारखाने स्थानिक वीज व पाणी यांचीही मागणी करतात व हा सर्व बोजा पेलणे प्रशासनाला त्रासदायक ठरते. त्यामुळे अलीकडेच काही मोठ्या कापड उद्योजक कंपन्यांना चीनमध्ये नवे कारखाने उभारण्याची परवानगी देण्यात आलेली नाही.

**भारतात उत्साहाचे वातावरण**

वस्त्रोद्योगाच्या निर्यातीमुळे भारतालाही फायदा होणार असल्याने येथील कापड उद्योगात एकदम उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. रेमंड व अरविंद या भारतातील दोन मोठ्या कंपन्यांनी आपले उत्पादन वाढविण्याचे ठरविले असून तशी पावलेही उचलली आहेत. अर्थात, चीनची निर्यात जेवढ्या मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे तेवढी भारताची वाढणार नाही; कारण, या उद्योगक्षेत्रातील भारताची क्षमता चीनएवढी नाही. पूर्वी हा निर्यातीचा कोटा भारतासाठी मर्यादित असल्याने अरविंद मिल्सने आपला एक अत्याधुनिक कारखाना मॉरिशस येथे सुरू केला होता व तेथून ते निर्यात वाढवू पाहात होते. आता कोटा रद्द झाल्याने हा कारखाना भारतात आणण्याची त्याची तयारी आहे. डेनिम कापड बनविण्यात अग्रेसर असलेल्या या कंपनीचे मुख्य ग्राहक अमेरिकेतील 'द गॅप' व 'लेविस' हे मोठे विक्रेते आहेत. त्यांच्यासाठी हे उत्पादन दुपटीने वाढविण्याचा निर्णय कंपनीने घेतला आहे.

जागतिक कापड उद्योगातील भारताचा वाटा ३ टक्के आहे; तो या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते ७ ते १० टक्क्यांपर्यंत वाढू शकतो. वेलस्पन इंडिया या कंपनीचे अध्यक्ष अखिल जिंदाल यांना आपला टॉवेल्सचा उद्योग दुपटीने वाढण्याची आशा आहे. वेलस्पनतर्फे अमेरिकेतील जॅक पेनी, कॅलविन क्लीन आणि वॉलमार्ट यांना टॉवेल्स व बाथरोब्स पुरविण्यात येतात. गुजरातमधील कांडला येथे या कंपनीचा आधुनिक कारखाना उभा असून त्यांनी आपले उत्पादन वाढविण्यास सुरूवातही केली आहे. आंतरराष्ट्रीय


बाजारपेठेत आता कापड उद्योगातील वस्तूंचा उत्तम दर्जा आणि तरीही वाजवी वा कमी किंमत याला महत्त्व येणार असून उद्योगातील स्पर्धा वाढणार आहे, असे जिंदाल यांना वाटते.

## अमेरिका चीनची निर्यात रोखणार ?

या पार्श्वभूमीवर, चीनमधील उद्योग या घटनेकडे काळजीपूर्वक नजरेने पाहात आहेत. कारण चीनकडून होणारी निर्यात वाढल्यास अमेरिकेतील कापड निर्माण करणाऱ्या कंपन्या व त्यातील कर्मचारी अडचणीत येतील. म्हणून अमेरिका ही निर्यात रोखण्याचा वेगळा प्रयत्न करण्याची शक्यता आहे. चीनची निर्यात वाढल्यास अमेरिकेतील ६ लाख ५० हजार कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या संपुष्टात येतील, असा अंदाज अमेरिकेतील कापड उद्योग संघटनेच्या राष्ट्रीय मंडळाने व्यक्त केला आहे. वस्त्रे व तयार कपडे आयात करणाऱ्या उद्योजक कंपन्यांच्या मते ही संख्या वाढवून सांगितली गेली आहे. कापड उद्योग संघटनेच्या अहवालानुसार, अमेरिकेने तयार कपड्यांच्या २९ प्रकारांवरील आयातीसंदर्भातील निर्बंध कमी केल्याने, यातील २००१ मध्ये चीनचा वाटा ९ टक्के होता तो मार्च २००४ पर्यंत ६५ टक्के एवढा वाढला. या संघटनेचे अध्यक्ष रॉबर्ट डूप्री यांनी म्हटले आहे की, विनिमय दराचा विचार करता, चीन आपल्या चलनाचे मूल्य कमी ठेवते व स्पर्धेत टिकण्यासाठी आपल्या देशातील कापडउद्योग व्यावसायिकांना अल्पदरात कर्ज देते. त्यामुळे अमेरिकेच्या सरकारवर चीनमधून आयात होणाऱ्या वस्त्रप्रावरणांवर ७.५ टक्के 'ग्रोथ सिलिंग' लावण्याबाबत दबाव आणण्यात येत आहे. असा अधिभार काही कपड्यांवर लावण्यातही आला आहे. तसेच निर्यातवाढीची शक्यता लक्षात घेऊन आणखी काही संरक्षणात्मक उपाययोजना करण्याची चर्चाही चालू आहे.

दरम्यान, अमेरिकेतील आयातदार मात्र चीनच्या वाढणाऱ्या निर्यातीवर खूष आहेत. चीनकडून चांगल्या दर्जाच्या, कमीत कमी किंमतीतील व योग्य वेळेत मिळणाऱ्या तयार कपड्यांची त्यांना प्रतीक्षा आहे. या पार्श्वभूमीवर चीनने सावध पावले उचलण्याचे ठरविले आहे. एकदम फार मोठ्या प्रमाणावर निर्यात वाढविण्यापेक्षा त्यांनी थोडे दमाने घ्यायचे ठरविले आहे. म्हणजे अमेरिकेचा व जगाचा रोष आपल्यावर ओढवून घेऊन त्यांना नेहमीसाठी आपले नुकसान करायचे नाही. म्हणून निर्यातवाढीचा फायदा चीनला होणार असला तरीही, निर्यातीवर काही प्रमाणात तरी निर्बंध आणण्याचा चीनच्या सरकारचा प्रयत्न आहे.

*(संदर्भ - इंटरनेट, फार ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू ९ सप्टेंबर २००४)*



# शांततेच्या पाऊलखुणा

## शिक्षणातून शांततेकडे

*एकोणिसशे एकोणचाळीस साली पहिलं महायुद्ध होऊन गेलं होतं आणि दुसऱ्या महायुद्धाचे नगारे वाजू लागले होते. या पार्श्वभूमीवर शांततेचे महत्त्व विशद करून सांगताना, प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ. मारिया मॉंटेसोरी यांनी तेव्हाच्या शिक्षण पद्धतीत महत्वाचे बदल सुचवले होते. त्यांचे त्यावेळचे (१९३९) शिक्षणविषयक विचार आजच्या काळालाही तंतोतंत लागू पडतात. त्यांचा 'विश्वभारती क्वार्टरली' फेब्रुवारी -एप्रिल १९३९ मधील मधील लेख येथे अनुवादित करून देत आहोत - संपादक)*

आज- सर्व जगच युद्धाच्या सावटाखाली आहे. काही जण याचे समर्थन 'सुरक्षिततेसाठी युद्ध' असेही करतील. परंतु कुठल्याही शस्त्राच्या धाकाने मिळणारी सुरक्षा चिरकाल टिकणारी नसेल. म्हणूनच मला वाटतं की, कुठल्याही समाजाचं स्वास्थ आणि सुरक्षितता बंदुकीच्या नळीवर अवलंबून नसावी. कारण क्रांतीचं अपत्य जशी क्रांती असते, तसेच, एक युद्ध दुसऱ्या युद्धाला जन्म देते. युद्धातील विजय आपल्याला स्थैर्य, सुबत्ता देऊ शकत नाही.

**शांततेचे महत्त्व**

समाजाला खऱ्या अर्थाने निर्भय आणि प्रगतिशील बनवायचे असेल तर तेथे शांतता प्रस्थापित करणे गरजेचे आहे. शांतता केव्हा प्रस्थापित होऊ शकेल ? शांततेसाठी समाजातील प्रत्येक माणूस संघटित व्हायला हवा. आणि माणूस संघटित केव्हा होईल ? जेव्हा त्याला त्या प्रकारचे शिक्षण मिळेल तेव्हा. म्हणून समाजोन्नतीसाठी आणि सुरक्षिततेसाठी 'शिक्षण' हे एक प्रभावी शस्त्र आहे, असे म्हणता येईल.

अर्थात शिक्षणाचा उपयोग आपल्याला समाजाच्या कल्याणासाठी करुन घ्यायचा असेल, तर त्याला संकुचित आणि मर्यादित चौकटीतून बाहेर काढणे गरजेचे आहे. आजचे शिक्षण काळाच्या कितीतरी योजने मागे आहे. आजच्या गरजांच्या दृष्टीने प्रचलित शिक्षण पद्धतीत तातडीने बदल करणे आवश्यक आहे. ज्या शिक्षणाच्या

माध्यमातून शांतता प्रस्थापित करायची आहे असे शिक्षण सर्वंकष असावे. फक्त सकारात्मक किंवा नकारात्मक नसावे. उदा. शांततेचे धडे द्यायचे म्हणजे शिकवताना युद्धाचे संदर्भ टाळणे किंवा इतिहास म्हणजे युद्धाची मालिका असा समज करून घेणे चुकीचे आहे. असा विचार करून उद्या कुणी मुलाला खेळायलाही लुटुपुटीची बंदुक किंवा सैनिक आणायचा नाही असा विचार केला तर तो पोरकटपणा ठरेल. तसेच, मुलाने मानवी जीवनावर, मानवाच्या कलानिर्मितीवर आणि त्याने उभारलेल्या भव्यदिव्य वास्तूंवर प्रेम करावे म्हणून त्याला सजीव -निर्जीव वस्तुंविषयी आदरभाव बाळगायला शिकविणारे शिक्षणही तितकेच अपुरे आणि प्राथमिक अवस्थेतील आहे. शिक्षणाद्वारे फ़क्त समतेची आणि बंधुतेची शिकवण द्यायची असेल, तर आजवर अनेक धर्मांनी, राजकारणाने, समाजकारणाने कोणती वेगळी शिकवण दिली ? मानवी जीवनाला, स्वातंत्र्याला त्यांनी पवित्र मानले, अशा शिकवणुकीतून घडलेला माणुस शेवटी दुसऱ्याच्या जीवावर का उठला ?

यावरून एक गोष्ट सिद्ध होते की, विशिष्ट प्रकारचे शिक्षण दिल्याने किंवा न दिल्याने माणूस युद्धप्रवृत्त किंवा परावृत्त होत नसतो. माणसे रक्तपिपासू असतात किंवा त्यांना शस्त्र वापरायची खुमखुमी असते म्हणून लढत नाहीत. इतिहासातील युद्धाच्या दाखल्यांचा वर्तमानकाळाशी फ़ार क्वचित संबंध असतो. प्रत्यक्षात युद्धाची कारणे त्यापेक्षाही गुंतागुंतीची असतात.

## शिक्षणापुढील आव्हाने

सर्वप्रथम आपल्याला हे जाणून घ्यावे लागेल की, आज जगात ज्या घडामोडी वेगाने घडत आहेत, त्यांचे महत्व शिक्षणाच्या माध्यमातून आपल्यापर्यंत कधी आलेच नाही.त्यामुळे पूर्ण समाज गोंधळून गेला आहे. त्यामुळे माणसाला युद्धप्रवृत्त करणाऱ्या नेमक्या प्रेरणा कोणत्या हेच समजेनासे झाले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरचे वाद सोडाच परंतु राष्ट्रांतर्गत कलहाने बरेचसे देश पोखरले गेले आहेत. स्वार्थ कसा साधायचा याचाच जो तो विचार करतो आहे. 'एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ' या ध्येयापासूनच आजचे शिक्षण ढळले आहे. फक्त एका वर्गातून दुसऱ्या वर्गात जाणे आणि शिक्षणाच्या नावाखाली गुण कमावणे एवढीच गोष्ट विद्यार्थ्यांना ठाऊक आहे. इतकेच काय स्वत:च्या आवडी -निवडी जोपासण्याचे स्वातंत्र्यही त्यांना उरलेले नाही. वाळवंटातील वाळूचा प्रत्येक कण अन् कण जसा वेगळा, दुसऱ्याशी फारकत ठेवून असतो, तशीच आजच्या समाजाची अवस्था झाली आहे. एका

वाऱ्याच्या झोतासरशी अशा चैतन्यहीन समुहाचा नाश व्हायला वेळ लागणार नाही. या परिस्थितीत शिक्षणावर फ़ार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. येणाऱ्या अनेक पिढ्या ज्यामुळे सुजाण होतील, समृद्ध होतील अशा शिक्षणाचा पाया घालणे ही लहान -सहान गोष्ट नाही. आपल्याला आत्मिक विकासाबरोबरच कणखर आणि सशक्त व्यक्तिमत्व घडवायचे आहे. विज्ञान -तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे जागतिक व्यापारात, व्यवहारात सुसुत्रता आली. त्याप्रमाणेच मानवी क्षमतांकडे, शक्तींकडे वैज्ञानिक दृष्टीने पाहणे गरजेचे आहे. विश्वाची कोडी उलगडणाऱ्या माणसाने आपली प्रतिभा, बुद्धिचातुर्य, सद्सदविवेकबुद्धी यांना योग्य दिशा देऊन, त्यांना समाजात महत्वाचे स्थान प्राप्त करून देणे आवश्यक आहे. ही त्याची बलस्थाने आहेत. दुर्दैवाने त्यांच्याकडे डोळेझाक होते. आजही शिक्षणपद्धतीत असणाऱ्या त्रुटींमुळे त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोण पुर्वग्रहदूषित आहे.

**बालकेंद्री विकास**

मूल घडण्याची प्रक्रिया घरापासून सुरू होते. बऱ्याचदा लहान मुलांना समजून घेण्यात मोठी माणसेच कमी पडतात. एखादी गोष्ट, लहान मुले त्यांच्या पद्धतीने करत असताना आपण विनाकारण किंवा आपल्याही नकळत त्यांना विरोध करतो. आपल्या दृष्टीने ते काम कितीही वेडगळ असले तरी, बालकांच्या दृष्टीने अर्थपूर्ण असते. पालकांचा असहकार असाच चालू राहिला तर दोघांमध्ये तेढ निर्माण होण्यास वेळ लागत नाही. लहान वयातच आपली मते त्याच्यावर लादली, तर मूल कधी चिडखोर -बंडखोर तर कधी हळवे आणि कमकुवत होते. खरे तर, त्यांचा हट्ट हा त्या लहानग्याच्या समजुतीप्रमाणे हट्ट नसतोच. हट्ट म्हणजे नेमके काय, हेच मुळी त्याला कळलेले नसते. पण पालक मुलांच्या हट्ट नसलेल्या वागणुकीला हट्ट असे समजतात. त्यामुळे मुलाचे वर्तन आणखी बिघडू शकते. काहीवेळा हे वर्तन गुन्हेगारीसही प्रवृत्त होते. अशारितीने एक मानवी आयुष्य उद्धवस्त होते, वाममार्गाला लागते.

लहान मुलाचे अस्तित्व एका बीजाप्रमाणे असते. त्या बीजात समृद्ध, चहुअंगानी बहरलेला वृक्ष निर्माण करण्याचं सामर्थ्य असते. गरज असते फक्त पोषक घटकांची. तसेच या मुलांना पूरक वातावरण मिळाले की, एक सुदृढ पिढी तयार होणे शक्य होईल. उदा. बहुतेकवेळा मुलांना दुसऱ्या मुलाने घेतलेली वस्तू हवीशी वाटते. मिळाली नाही की, ते भांडतात, आरडाओरडा करतात. एकदा का मिळाली की, थोडावेळ खेळतात आणि मोडून टाकतात. पण हेच जर आपण त्यांना नीट समजावून

सांगितले तर ती शांत राहून निरीक्षण करतात. वस्तू मिळाली की, शांतपणे खेळून ती जागच्या जागी ठेवून देतात. बालशिक्षणाचा आमचा हा अनुभव आहे. केवळ वातावरण बदलल्याने त्यांच्या वागण्यात कमालीचा बदल झाला. मत्सराची, आक्रमकपणाची जागा सहकाराने घेतली. अशी मुले मानवतेच्या दृष्टीने आशेचा किरण आहेत. एकदा प्रयोग म्हणून आम्ही एका मुलासाठी त्याला आवश्यक त्या सर्व गोष्टी असलेले वातावरण तयार केले. अर्थात, या बदल्यात त्याने आमचे आभार मानावेत अशी अपेक्षा नव्हती. पण त्या बदल्यात त्याच्या ऱ्हदयातला माणुसकीचा झरा आम्ही अनुभवला. हाच दृष्टिकोण आपण पौगंडावस्थेतील मुलांबाबतही बाळगायला हवा.

## सामाजिक प्रेरणा महत्त्वाची

मुलांचे व्यक्तिमत्व घडविणाऱ्या सहजप्रेरणांना फुलवण्याचे काम शिक्षणाने केले पाहिजे. यातही सर्वांत महत्त्वाची आहे सामाजिक प्रेरणा. मुलांना सामाजिक अनुभवांपासून जर आपण वंचित ठेवले तर, त्याच्यात सामाजिक व्यवस्थेची, नीतिमत्तेची समज निर्माण होत नाही. मग जी गोष्ट त्याने नैसर्गिकरित्या आत्मसात करायला हवी होती, ती 'असं कर' किंवा 'करू नको' असे म्हणून त्याच्यावर लादण्यात काय अर्थ आहे? त्यात स्वातंत्र्यापेक्षा गुलामगिरीच आली. भावी पिढीतला माणूस घडवणे आता आपल्या हातात आहे. त्यासाठी बालकाच्या वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर त्याचे अनुभवविश्व समृद्ध करणारे वातावरण तयार करू या. मूल लहान असताना घर हेच त्याचे जग असते. काही वर्षांनी ते शाळेत जाऊ लागते. त्याला नवीन मित्र मिळतात. शाळेच्या शिस्तीचे पालन करावे लागते. नवनवीन प्रसंगांना तोंड देता-देता अनेक अडचणी येतात. त्यांच्यावर मात करावी लागते. हे सगळे अनुभव त्याचे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी आवश्यक त्या गरजा भागवत असतात. कुटुंबांकडूनच त्याच्या या गरजा समजून घेतल्या जाणार नसतील तर ज्या शाळांचे धोरण केवळ 'आदेशांचे पालन करा' हेच आहे, त्यांच्याकडून आपण काय अपेक्षा करणार ? बॉय स्कॉट्स म्हणतो त्याप्रमाणे मुलांना भरारी मारण्याची आपण संधी द्यायला हवी.

पौगंडावस्थेतील मुलांची गोष्ट जरा वेगळी आहे. एखाद्या गोष्टीचा शोध घेणे किंवा अभ्यास करणे एवढ्याच गोष्टी त्यांना पुरेशा नसतात. त्याला स्वतःचे अस्तित्व निर्माण करायचे असते. काम करुन पैसे कमवायचे असतात आणि स्वावलंबी व्हायचे असते. त्यांना समाजाचा घटक, नागरिक व्हायचे असते. त्यामुळे शिक्षणाच्या काळातच (असे अनुभव मिळण्यासाठी) कुटुंबावर अवलंबून न राहता, काम करुन पैसे मिळवणं,

प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत भाग घेणे, आणि स्वतःची सामाजिक जबाबदारी जाणून घेणे गरजेचे आहे.

आज ज्या राष्ट्रांना युद्ध हवे आहे, ते मात्र मुलांना आणि तरुणांना विसरले नाहीत. त्यांनी या वर्गाला संघटित करून त्यातून एक सामाजिक शक्ती निर्माण केली आहे. परंतु दुर्दैव असे की, युद्धसदृश्य धोरणे राबवणाऱ्या राष्ट्रांनीच ही पद्धत अवलंबली आहे. परंतु ज्यांना खरोखर शांतता हवी आहे, त्यांनी शांतता प्रक्रियेसाठी भावी पिढीला संघटित करण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. ■■

## विश्वशांतीची समस्या

शांती म्हणजे निष्क्रियता नव्हे. अकर्मकृत कोणीही राहू शकत नाही. ज्याला स्वतःला शांत व्हावयाचे आहे किंवा समाजात, जगात शांती प्रस्थापित करावयाची आहे त्याला कंबर कसून कामासच लागले पाहिजे. पण तत्पूर्वी हे लक्षात ठेवले पाहिजे की शांती ही एकटीच कधी अवतरू शकणार नाही. आपल्या जुन्या वैदिक आशीर्वादात 'शान्तिः पुष्टिस्तुष्टिश्चास्तु' असे म्हणण्याचा प्रघात आहे. तो याबाबत मोठा सूचक आहे. मनाची शांती असल्याखेरीज 'पुष्टी' आणि 'तुष्टी' यांच्यातही उणेपणा राहील, पण पुष्टी आणि तुष्टीखेरीज शांती अशक्यप्राय आहे, असाही याचा अर्थ होतो. जो केवळ परमार्थाच्या मागे लागला, त्याची गोष्ट सोडा, पण अतिबहुजनसमाजाला सर्वांआधी पुष्टीची व त्याबरोबरच तुष्टीची आवश्यकता असते. या गोष्टींचा लाभ झाल्यानंतरच मग शांतीच्या उद्भवाची शक्यता संभवते. प्राणिमात्राच्या शारीरिक व मानसिक गरजा:भागल्यानंतरच इतर गोष्टींकडे वळण्याची त्यांची प्रवृत्ति असते. वेदांताचा विचार चालू असतानाही टीका करताना श्रीमधुसूदन सरस्वती यांनी 'भोगान्निवृत्तिः':असे यासाठीच सांगितले आहे. क्षुधा निर्माण झाली तर तिला आहुति दिल्यानंतरच म्हणजे अन्नाचा भोग चेतवल्यानंतरच तिची निवृत्ति, हाच न्याय सर्वत्र लागू आहे. जगातील बहुजनसमाजाला आवश्यक त्या वस्तूंनी पुष्टि प्राप्त झाली व त्यामुळे हा समाज संतुष्ट झाला तर शांतीचा प्रयोग सफल होण्यास अनुकूल वातावरण निर्माण होईल हे स्पष्ट आहे. पण याचीच तर मुख्य उणीव भासत आहे. त्याबरोबरच ज्या तऱ्हेने हा मूलभूत प्रश्न सोडविण्याचा जो मार्ग गेल्या शतकात अनुसरला गेला, त्याच्यामुळेही शांतीचा प्रश्न सुटण्याऐवजी जास्त बिकट होऊन बसला आहे. *(संदर्भ - विश्वशांतीची समस्या -शेजवलकरांचे लेख)* ■■

# जीवन आणि शिक्षण

श्री. सतीशकुमार हे इंग्लंडमधील 'रिसर्‌जन्स' या मासिकाचे संपादक आहेत. गांधीजींच्या बुनियादी शाळेशी ते पूर्वी जवळून संबंधित होते. त्यांनी ऑक्टोबर २००४चा अंक 'जीवनसातत्यासाठी शिक्षण' या विषयावर काढला आहे. याच अंकात प्रसिद्ध वैज्ञानिक फ्रिज्यो काप्रा (ताओ ऑफ फिजिक्स, टर्निंग पॉईंट, अनकॉमन विस्‌डम इ. पुस्तकांचे लेखक) यांचा 'पर्यावरणीय साक्षरते'वरचा लेख आणि याच विषयावरील काही लेख प्रकाशित केले आहेत. त्यांचे स्वत:चे शिक्षणविचार व्यक्त करणारी छोटीशी प्रस्तावना त्यांनी लिहिली आहे.

सतीशकुमार यांनी, गांधीप्रणित शिक्षणविचाराची व्यापकता आणि काही सुसंगतता जाणली आहे. गांधी विचारांवर आधारित 'नयी तालीम' मध्ये, मुले शेती करीत असत, हस्तोद्योगाद्वारे आपला शैक्षणिक म्हणजे बौद्धिक नि आध्यात्मिक विकास साधीत असत. या प्रकारच्या शिक्षणात, शिकणे आणि उपजीविका यांचा परस्परांशी पूरक संबंध बांधलेला असे. गांधीजींनी 'उपजीविका' आणि 'जीवनमान' या दोन संकल्पनांमध्ये मूलभूत भेद कल्पिला आहे. पहिल्याचा संबंध मानवी गरजांशी आहे; तर दुसरी संकल्पना माणसाची 'हांव', सांगत असते. उपजीविका ही माणसाच्या जीवनाच्या दर्जाविषयी बोलत असते तर जीवनमानात भौतिक उपलब्धींचा संख्यात्मक समावेश असतो. उपजीविकेने माणसाच्या भौतिक नि आध्यात्मिक गरजा भागविल्या जातात, आणि त्यातून जीवनाची एकात्मता, शांतता व खरे स्वातंत्र्य प्राप्त होते. तर, वाढत्या जीवनामानाच्या मागे लागल्यामुळे आपणच कधीही पुऱ्या न होणाऱ्या इच्छांच्या तावडीत सापडतो. आणि विशेष म्हणजे त्यातून अखेरीस सामाजिक आणि पर्यावरणीय अशा दोन्ही प्रकारच्या सुसंबंधांचा विनाश होतो.

सतीशकुमार यांचे मत असे की जेव्हा आपण शिक्षणाचा संबंध वाढत्या जीवनमानप्राप्तीशी जोडतो, तेव्हा तो रोजगार, नोकऱ्या किंवा करियर या व्यक्तिगत यशावर नि एकूणच व्यक्तिवादावर आधारित अशा गोष्टींशी बांधत असतो. याच्या उलट उपजीविकेसाठी शिक्षण, अशी कल्पना आपण आपल्यासमोर ठेवली तर तिचा

संबंध, परस्परांतील नाती, परस्पर स्नेहभाव, परस्परांतील देवाण -घेवाण, सामुदायिकता, एकवाक्यता आणि पर्यावरण यांच्याशी बांधला जातो. यातून जीवनसातत्याकडे वळता येते. बुद्धाने 'योग्य उपजीविका' (Right Livelihood) अशी जी संकल्पना दिली आहे, तिच्यावर शिक्षणाची बांधणी केली पाहिजे, असे सतीशकुमार सुचवतात.

सतीशकुमार मुख्यत; शिक्षणपरिवर्तनाचा आग्रह धरताहेत. मानवाच्या नि अवनीच्याा भवितव्यासाठी असे परिवर्तन तातडीने करण्याची आवश्यकता ते प्रतिपादन करताहेत. कारण, जवळजवळ सर्वच शालेय नि महाविद्यालयीन शिक्षणव्यवस्था ही भौतिक नि उपभोगप्रधान उद्दिष्टांनी मळलेली आहे. या शिक्षणव्यवस्थेत अर्थपूर्ण शिक्षणाऐवजी साक्षरतेवर, परिवर्तनाऐवजी माहितीवर आणि शिकण्याऐवजी शिकविण्यावर भर दिला जातो. सतीशकुमारांची आजच्या शिक्षणतज्ज्ञांवरील टीका अशी आहे की, तेही या (भोगवादी) अर्थव्यवस्थेचे गुलाम झाले आहेत; आणि त्यामुळेच, मानवाच्या नि भूमातेच्या बाबतींतील विनाशकारी परिणामांच्या संदर्भात ते उदासीन आहेत. ■■

## तुर्कमेनिस्तानमधील (बुद्धीहीन !) शिक्षण

एखादा गरीब देश आपल्याच देशातील सुशिक्षित नागरिकांना, विशेषतः परदेशांत शिक्षण घेतलेल्यांना, विविध पदांवरून दूर करून आपल्याच देशाचे नुकसान करील काय ? हा प्रश्नदेखील हास्यास्पद आहे. पण, मध्य आशियातील तुर्कमेनिस्तान नेमके हेच करणार आहे ! अलीकडेच तेथील नव्या नियमांनुसार १९९३ नंतर ज्यांनी परदेशांत शिक्षण घेतले आहे, त्यांच्या पदव्या ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. म्हणजे अनेक शाळा, रूग्णालये व इतर कार्यालये फारच मोठ्या अडचणीत येणार आहेत. (अर्थात, या नियमाची अंमलबजावणी अजून झालेली नाही.)

१९९१ मध्ये हा देश स्वतंत्र झाल्यानंतर त्यांनी पूर्वीच्या रशियन शिक्षणपद्धतीपासून फारकत घेतली आहे. त्यांनी काही नवी शैक्षणिक धोरणे आखली. त्यानुसार तेथील मूलभूत शिक्षण नऊ वर्षे असून सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत मुलांना शेतावर पाठविण्याची सोय आहे. आणि तेथे 'रूखनामा' या नैतिक शिक्षण देणाऱ्या ग्रंथातील उतारे शिकणे व शिकविणे बंधनकारक झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा बराचसा वेळ या कामी खर्च होतो. परिणामी तेथील विद्यार्थ्यांचा बौद्धिक दर्जा खालावतो आहे, असे आढळले. या शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना साधारणतः शालेय शिक्षणातील अपेक्षित असलेले मूलभूत ज्ञानच नाही, अशी दयनीय परिस्थिती निर्माण झाली आहे.

*(संदर्भ द इकॉनॉमिस्ट २४ जुलै २००४)* ■■

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY LIBRARY



# गरीब देश, गुंतवणूक व विकास

गरीब देशांमधील गरिबी दूर होण्यासाठी तेथे विविध प्रकल्पांमध्ये, योजनांमध्ये गुंतवणूक वाढणे गरजेचे असते. पण आवश्यक असलेली ही गुंतवणूक तेथे झालेली दिसत नाही. याचे मुख्य कारण पुन्हा गरिबी हेच असते. म्हणजे हे एक दुष्टचक्र चालूच असते.

गरीब गटात किंवा अत्यल्प विकसित देश (Least Developed Countries-LDCs ) या गटात मोडणाऱ्या ५० टक्के नागरिकांची मिळकत ही दिवसाला एक अमेरिकन डॉलरपेक्षाही कमी असते. इसवीसन २००० मध्ये अशा नागरिकांची संख्या सुमारे ३३ कोटी ४० लाखावर होती; इसवीसन २०१५ मध्ये ती ४७ कोटींवर जाईल असा अंदाज आहे. गरिबीमधून येणाऱ्या विविध मर्यादांमुळे, देशांतर्गत संसाधने निर्माण करण्याची त्यांची क्षमता आणखीनच खालावते.

या गटातील २८ देशांमधील एकूण भांडवल निर्मितीचे दरडोई उत्पन्नाशी असलेले प्रमाण हे १९९८ मध्ये २०.२ टक्के होते; ते २००२ मध्ये २३ टक्के एवढेच वाढले. आणि त्यांचा बचतीचा दर ४.४ वरून ४.८ टक्के एवढा वाढला. या देशांना बाहेरच्या देशांकडून बरेच मोठे आर्थिक साहाय्य इसवीसन २००२ मध्ये घ्यावे लागले.

अनेक राष्ट्रांची बाह्य कर्जे वाढताना दिसतात. उदा. २००२ साली ४३ देशांतील कर्जसाठा २००१ पेक्षा ८ अब्ज डॉलर्सने वाढला. आणि कर्जांच्या देखभालीचा खर्च ५ अब्ज या उच्च पातळीला पोचला.

अलीकडे, अनुदानांचाही मूलभूत सोयी सुविधांसाठी मोठा वापर केला जातो. मात्र उत्पादक, उत्पादनक्षमतेच्या विकासासाठी दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्याचे प्रमाण १९८० नंतरच्या दोन दशकांमध्ये सुमारे ५० टक्क्यांनी कमी झाले आहे.

*(संदर्भ - अँनन २००४, द लिस्ट डेव्हलपड कंट्रीज रिपोर्ट २००४, युनायटेड नेशन्स कॉन्फरन्स ऑन ट्रेड अँड डेव्हलपमेंट, डाऊन टू अर्थ -१५ जुलै २००४)*

■■

## ‘काल’ चे ‘आज’ साठी

[बरोबर शंभर वर्षांपूर्वी केशवसुतांनी आपल्या मोजक्या कवितांतून, काही गंभीर आणि खंबीर असा विचार त्यांच्या पिढीतील युवकांना दिला. (केशवसुतांचा कविताकाळ हा १८८५ ते १९०५ असा आहे.) आज आचार-विचारांत प्रतिगामित्वाची वावटळ आली आहे; तिला थोपविण्याचे धैर्य येण्यास केशवसुतांच्या अनेक पंक्ती आपल्या सर्वांना, विशेषतः युवक-युवतींना उपयुक्त ठरतील.-संपादक ]

अहिंसा हा चेष्टेचा विषय असू शकत नाही. आपले जीवन शांततेत व्यतित व्हावे, इतपत जाणीव आणि आपल्याबरोबरच दुसऱ्यानेही शांततेने जगावे इतपत उदारता मनात बाळगणाऱ्या प्रत्येकाला अहिंसा ही अपरिहार्य गोष्ट आहे हे दिसून येईल. आपल्या कुटुंबात जर आपण हिंसेला थारा देणार नसू तर तो विश्वकुटुंबातही देता कामा नये. जग जागते ठेवणाऱ्या तरुणांनी, शांततेचा श्वास घेण्यासाठी शांततेचा ध्यास घेतला पाहिजे.

केशवसुत लिहीत होते तेव्हा विसाव्या शतकाने अनुभवलेली दोन भीषण महायुद्धे त्यांच्या वैचारिक आकाशात अवतरलेली नव्हती. तरीही त्यांनी स्वतःला शांतीचे साम्राज्य स्थापन करणाऱ्या काळाचा प्रेषित म्हणून संबोधले आहे. केशवसुत आपल्या ‘नवा शिपाई’ या कवितेत, अखेरच्या कडव्यात, आजच्या काळात जगणाऱ्या अशा आपल्यापैकी प्रत्येकालाच आत्मपरीक्षा करायला भाग पाडताहेत, ते त्यांची चिंता व्यक्त करून. केशवसुत लिहितात,

हलवा करितां तिळावर जसे कण चढती पाकाचे,
अहंस्फूर्तिच्या केंद्रभवतें वेष्टन तेंवि जडाचें;
आंत समचि निर्गुण तिलक, वरी सदृश सगुण तो पाक,
परि अन्यां बोंचाया धरितो कांटे कीं प्रत्येक !
अशी स्थिती ही असे जनीं !
कलह कसा जाइल मिटुनी ?
चिन्ता वागे हीच मनीं

शांतीचे साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे !

केशवसुतांची ही कविता ८ मार्च १८९८ ची आहे. शंभर वर्षे होऊनही गेली पण शांतीच्या साम्राज्याचे क्षितीज दूर दूरच जात आहे. परिस्थिती अधिकच बिकट होत चालली आहे.

मानवामानवांमधील मूळ चैतन्य, आपली समानता विसरून, आणि व्यक्तींच्या जड शरीराने 'स्व'त्याचे माजवलेले अहंकारी रूप एकमेकांना काटे होऊन बोचत आहे. त्यातून जीवनातील कलह निर्माण होत आहेत. आणि साऱ्या अशांतीचे मूळ हेच आहे.

केशवसुतांनी वर्णिलेले हे व्यक्तिगत अशांतीचे मूळ तर टिकून आहेच, पण त्याने आता गट पातळीवरचे अक्राळविक्राळ रूपही धारण केले आहे. जातीगट, पोटजातीगट, राजकीय पक्ष, उपपक्षांचे गट, धर्मगंड असणाऱ्यांचें गट असे अनेक गट निर्माण होऊन, त्यांच्या अहंकारी कारवायांनी कलहमालिकाच चालू झाल्या आहेत. हे कलह विवेकांनी-विचारांनी मिटविले जात नाहीत तर हिंसक कृतींकडेच त्यांचा ओढा आहे. आणि नागरिकांचे साधे-सुधे दैनंदिन जीवनही हिंसक घटनांनी झाकोळले जात आहेत. केशवसुतांची तेव्हाची चिंता आज अधिकच तीव्र झाली आहे. ✿✿✿

---

*(पान क्रमांक ८ वरून)*

यावरून दिसून येते की अमेरिकेतच नव्हे तर युरोप आणि इतरही देशांमधून, पुढील काळात हा 'उदारतानिधी' वाढत जाणार आहे. म्हणजे, प्रत्यक्ष रक्कम तर वाढेलच पण राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेली त्याची टक्केवारीही वाढणार आहे. श्रीमंत राष्ट्रांतील श्रीमंतांचे आयुर्मान आणि श्रीमंती दोन्हीही वाढत जात आहेत.

मनात उभा राहणारा प्रश्न असा आहे की हे चांगले म्हणावे की म्हणू नये ?


परोपकाराची भावना, उदारता आणि प्रत्यक्ष देणग्यांच्या रकमा वाढणे चांगले पण, त्याची दुसरी बाजू आहे ती घेणाऱ्यांची. त्यांची मानसिकता, देणग्या ज्यासाठी मागावयाची त्याची कारणे, ते प्रश्न या साऱ्या गोष्टी जगात अशाच अनंत काळ टिकून राहाव्यात की काय ?

*(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट -३१ जुलै २००४, फिलन्थ्रपी वरील विशेष लेख)*

# आपली स्वप्नं पूर्ण करा !

- गृह कर्ज
- आधार स्कीम
- ग्राहकोपयोगी कर्ज
- किसान क्रेडिट कार्ड
- शैक्षणिक कर्ज
- रिकरिंग डिपॉझिट स्कीम

अवघ्या कुटुंबाची....
अवघ्या समाजाची
बांधिलकी जपणारी...
महाबँक



New Horizon '04

**बँक ऑफ महाराष्ट्र**
'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर, पुणे-411 005.
www.maharashtrabank.com


## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

(१५ ऑक्टोबर २००४ पासून)

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त १००/ - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी एकत्र पाठविल्यास** | **फक्त १८०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी एकत्र पाठविल्यास** | **फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट** |
| **पंचवार्षिक वर्गणी एकत्र पाठविल्यास** | **फक्त ४००/- रुपये व दोन पुस्तिका भेट** |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये) (५) गव्हर्नन्स, सुपरव्हिजन अँड मार्केट डिसिप्लिन : लेसन्स फ्रॉम एन्रॉन (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयंत वर्मा (किंमत शंभर रुपये)

# अर्थबोध-वृत्त

*(भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीतर्फे अनेक उपक्रम चालतात. इंग्रजी जर्नल, चर्चासत्रे यांव्यतिरिक्त ग्रंथालयातही नवीन पुस्तकांची आवक सतत होत असते. अर्थबोधपत्रिकेच्या सदस्यांना या ग्रंथालयाचा लाभ घेता येतो. या उपक्रमांचा नि पुस्तकांचा अल्पसा परिचय या सदरामधून देण्याचा आमचा मानस आहे. - संपादक)*

## ग्रंथालयातील नवी पुस्तके

**(1) Economic Development - 8th Edn. - Michael P. Todaro & Stephan C. Smith, Pearson Education. pp. 829; Price Rs. 350/- [parts 4; Chapters 17]**

आफ्रिका, आशिया, लॅटिन अमेरिका, पूर्व युरोप, पूर्वीचा रशिया अशा राष्ट्रांमधील आर्थिक विकासावर भर असणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी या पुस्तकाचे प्रयोजन आहे. अर्थशास्त्राची थोडीफार ओळख असणाऱ्यांसाठी; किंवा, अर्थशास्त्राशी पूर्णपणे अपरिचित असणाऱ्यांसाठीही हे पुस्तक उपयुक्त आहे. विकासाशी संबंधित असलेली तत्त्वे, संकल्पना आणि व्याख्याही मोठ्या अक्षरांमध्ये दिल्या आहेत. इंग्रजी माध्यम असणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विशेष उपयुक्त असणारे हे पुस्तक सामान्य वाचकांनाही वाचनीय वाटेल.

**(2) Pro -poor Growth & Governance in South Asia - Decentralization & Participatory Development - Ponna Wignaraja & Susil Sirivardana - Editors- Sage Publications; pp. 459; Price Rs. 420/-**

दक्षिण आशियातील दारिद्र्य कमी करण्यासाठी गेल्या काही दशकांमध्ये अनेक प्रयत्न झाले; फारशी फलश्रुती न होता. त्याचे एक कारण म्हणजे, या प्रयत्नांमध्ये दरिद्री लोकांना कधी सामावूनच घेतले गेले नाही. अलीकडच्या काळात थोडासा वेगळ्या दिशेने प्रयत्न केला जात आहे. दारिद्र्याचा सतत विचार न करता, प्रशासन, विकेंद्रीकरण आणि निर्मूलन यांचा समन्वित विचार करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले जाते. या पुस्तकात भारत, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ आणि बांगलादेश या राष्ट्रांमधील काही घटना घेऊन त्यातून गरिबांच्या विकासासाठी साहाय्यभूत ठरेल, अशी योजना कशी करता येईल याची विस्तृत आणि सखोल मांडणी आहे. ■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006
L.W.P. LICENCE NO. L-502

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●अजित कर्णिक ●विकास चित्रे ●कुमुदिनी दांडेकर
●ललित देशपांडे ●द.ना. धनागरे ●आनंद नाडकर्णी ●रमेश पानसे
●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●के. एन्. राज ●व्ही.एम्.राव ●ए.वैद्यनाथन
●सत्यरंजन साठे ●रामदास होनावर ●योगेंद्र यादव

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**